पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

गुरुवार, दि. १४ ऑगस्ट, २०२५ | वर्ष : १३ | अंक : २१९ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ शिरूरचे तिहेरी आमरण उपोषण मुंबईत धगधगले

४ २५ तारखेला रोडवर वृक्षारोपण करण्याचा इशारा !

५ रवंदेत अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

पान ८ वर..

**बाजारभाव - सोने**

२२ कॅरेट : ९२,६९०/-

२४ कॅरेट : १,००,१५०/-

**बाजारभाव - चांदी**

१ किग्रॅ. : १,१८,०००/-

# अजितदादा, भाजपला सोडा; राष्ट्रवादी पुन्हा एक होईल : आ.रोहित पवार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या वाढत चाललेल्या भेटी राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. ठाकरे बंधू हे काही निमित्त मात्र एकत्र येणार की, महापालिका निवडणुकीत युती करणार, याकडे राज्याचे लक्ष लागलेले आहे. त्यापूर्वीच मुंबईतील दि बेस्ट एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटीची निवडणूक दोन्ही पक्ष एकत्रित लढवित आहेत. यातच राष्ट्रवादी काँग्रेसअजित पवार गट आणि शरद पवार गट एकत्र येण्यावरूनही अनेकदा राजकीय वर्तुळात चर्चा होत असते. यावर आता पुतण्यांनी काकांना एक ऑफर देत विनंतीच





केल्याचे समजते. राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र येण्यासाठी एक अट ठेवण्यात आली आहे.

आ. रोहित पवार म्हणाले की, तुम्हाला एकच सांगतो की, आम्ही भाजपाच्या विरोधात आहोत. भाजपाच्या विचारसरणीच्या विरोधात आहोत. त्यामुळे जर अजित पवारांनी भाजपाची साथ सोडली आणि शरद पवार यांच्यासोबत पुरोगामी विचारासोबत ते आले, तर त्यावेळेस आम्ही विचार करू. पण, अजित पवार जर भाजपासोबत असतील तर आम्ही एकत्रित येऊच शकत नाही. भाजप, महायुतीला त्यांनी सोडले, तर सर्व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन आपण काय करायचे तो विचार केला जाईल आणि निर्णय घेतला जाईल, असे रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राहुल गांधींनी उघडपणे पुराव्यानिशी मतांची चोरी झाल्याचे सांगितले. आमच्याकडे सुद्धा पुरावे आहेत, टप्प्याटप्प्याने समोर येणार आहोत. मतांची चोरी म्हणजेच लोकशाहीची चोरी आहे. लोकशाहीची चोरी होत असेल तर, गरिबांना न्याय देता येणार नाही. निवडणुकीपूर्वी सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना अनेक प्रलोभन दिले. कर्जमाफी असो, बोनस असो, त्यात अजूनही त्यांनी शेतकऱ्यांना मदत दिलेली नाही. आश्वासने पाळली गेलेली नाहीत. आमच्यासोबत जे आहेत ते संपूर्ण निष्ठावान आहेत. त्यामुळे येत्या काळात यश नक्कीच येणार, अशा विश्वास रोहित पवारांनी व्यक्त केला.

राज्यात शिवसेनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही फूट पडली. मोठ्या संख्येने आमदार अजित पवारांसोबत गेले. लोकसभा निवडणुकीत अपयश आले, तरी विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाने मोठी मुसंडी मारली. अजित पवार पुन्हा उपमुख्यमंत्री झाले. अजित पवारांसोबत जे आमदार गेले, ते आता सत्तेत असून, शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील आणखी काही नेते त्यांची साथ सोडताना पाहायला मिळत आहेत.

## चुलतीला छेडल्याच्या रागातून तरुणाचा खून; दोघे आरोपी गजाआड

**जनप्रवास । प्रतिनिधी**




पुणे : शहरातील चंदननगर भागातील आंबेडकर वसाहतीमधील ३५ वर्षीय साईनाथ जानराव या व्यक्तीचा खून झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी आदित्य वाल्हेकर, समर्थ शर्मा या दोघा आरोपींना चंदननगर पोलिसांनी अटक केली आहे. चुलतीला आय लव्ह यू म्हटल्याने साईनाथ जानराव चा खून करण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली आहे. पोलीस हवालदार राहुल गिरमे यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,चंदननगर भागातील डॉ. आंबेडकर वसाहतीत आरोपी आदित्य वाल्हेकर,समर्थ शर्मा आणि साईनाथ जानराव राहण्यास आहेत. साईनाथ जानराव याने आरोपींच्या नात्यातील महिलेची छेड काढली.या कारणावरुन मंगळवारी १२ ऑगस्ट रात्री साडेआठच्या सुमारास आरोपी आदित्य वाल्हेकर, समर्थ शर्मा यांनी साईनाथ जानराव याच्याशी वाद घातला. तू काय म्हणालास, छेड का काढली ? असा जाब विचारला, असे म्हणत साईनाथ जानराव याला लाथाबुक्क्यांनी, हॉकीस्टीकने बेदम मारहाण केली.

या मारहाणीत साईनाथ जानराव उपचारांपूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.तर पसार झालेले आरोपी वाल्हेकर आणि शर्मा या दोघा आरोपींना पोलिसांनी काही तासात अटक केल्यानंतर आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे त्यांनी सांगितले.

## ‘मतचोरीच्या मुद्द्यामुळे माझ्या जिवाला धोका’

### राहुल गांधींची पुणे कोर्टात लेखी माहिती

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेत कर्नाटक आणि महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये बोगस मतदान झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. भाजप आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत राहुल गांधींनी चक्क पत्रकार परिषदेतच पुरावे सादर केले. त्यानंतर, देशभरात ईव्हीएमवरील निवडणूक प्रक्रिया आणि आयोगावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विरोधकांनी, इंडिया आघाडीने निदर्शने करत



आमच्या मतांची चोरी झाल्याचे म्हटले. त्यामुळे, राहुल गांधी सध्या चर्चेत असून आज त्यांच्याकडून न्यायालयात खळबळजनक माहिती लेखी स्वरुपात देण्यात आली आहे. मतचोरीच्या मुद्द्यामुळे राहुल गांधींच्या जीवाला धोका असल्याचं राहुल गांधींच्या वकिलांनी पुणे कोर्टात म्हटलंय. सात्यकी सावरकरांनी राहुल गांधींच्या विरोधात दाखल केलेल्या बदनामीच्या खटल्याच्या सुनावणी दरम्यान राहूल गांधींचे वकील मिलींद पवार यांनी लेखी स्वरुपात ही माहिती दिलीय.

लोकसभा २०२४ मधील निवडणुकीत झालेल्या मतचोरीचा मुद्दा उपस्थित केल्यामुळे माझ्या जीवाला धोका आहे, अशी माहिती लेखी स्वरुपात काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी पुण्यातील विशेष न्यायालयात दिली. राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बदनामी केल्याच्या आरोपावरून त्यांच्याविरुद्ध पुण्यातील न्यायालयात खटला दाखल आहे. त्यावरील सुनावणीवेळी राहुल गांधी यांचे वकील मिलिंद पवार यांनी ही माहिती लेखी स्वरुपात न्यायालयात दिली.

मिलिंद पवार यांनी न्यायालयात दिलेल्या लेखी माहितीनुसार, भाजपाचे नेते तरविंदर मारवा यांनी म्हटले आहे की, राहुल गांधी यांनी नीट वागावे, नाहीतर त्यांच्या आजीचे (इंदिरा गांधी) जे झाले, तेच राहुल गांधी यांचे होईल. भाजपाच्या आणखी एका नेत्याने राहुल गांधी यांना दहशतवादी म्हटले आहे. सध्याचे राजकीय वातावरण आणि या खटल्यातील याचिकाकर्ते सत्यकी यांचे गोडसे घराण्याशी असलेले संबंध पाहाता राहुल गांधी यांच्या जीवाला धोका आहे, अशी माहिती न्यायालयात आज देण्यात आली.

## बँकेत बनावट नोटा जमा करण्याचा प्रयत्न; गुन्हा दाखल



**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी : पिंपरी येथील एका बँकेत बनावट नोटा जमा करण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली. याप्रकरणी १२ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी बँकेच्या उपव्यस्थापकाने संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका व्यक्तीने ८० हजार १०० रुपये रोख रक्कम बँकेत जमा करण्यासाठी आणले होते. बँकेतील कॅशिअरने ग्लोरीकॅश सॉर्टिंग मशीनमध्ये या नोटा तपासल्या असता, २०० रुपयांच्या नऊ नोटा बनावट असल्याचे निदर्शनास आले. संत तुकारामनगर पोलीस तपास करत आहेत.

## पिंपरीतील व्यावसायिकावर गोळीबारप्रकरणी रवी पुजारी गँगचा सदस्य रवींद्र घारेला अटक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड : पिंपरीतील व्यावसायिकावरील गोळीबारप्रकरणी मालमत्ता विरोधी पथकाने सराईत गुन्हेगार रवींद्र भाऊसाहेब घारेला अटक केली आहे. पिंपरीतील व्यवसायिकाची सोनसाखळी हिसकावताना पायावर गोळी झाडली होती. यानंतर घारे फरार झाला होता. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये खळबळ उडाली होती.

सराईत गुन्हेगार रवींद्र भाऊसाहेब घारे हा गँगस्टर रवी पुजारी, सुरेश पुजारी यांच्याशी संबंधित आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्याला पैशांची चणचण भासत असल्याने त्याने पिंपरीतील व्यावसायिकाला हेरून त्याच्या गळयातील सोनसाखळी हिसकावण्याचा प्रयत्न केला. व्यावसायिकाने प्रतिकार केल्याने घारेने त्याच्या पायावर गोळी झाडली. भरदिवसा घडलेल्या या प्रकरणामुळे पिंपरीत एकच खळबळ उडाली.



आरोपीकडून १ पिस्तुल, ११ जिवंत काडतुसे, दोन दुचाकी जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती सह पोलिस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलिस आयुक्त सारंग आव्हाड यांनी सांगितली आहे. ही कामगिरी पोलिस उपायुक्त शिवाजी पवार, सहाय्यक पोलिस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विजय ढमाळ यांच्या निर्दशनात करण्यात आली आहे.

## दहशत माजविणाऱ्या ‘कोयताभाई’ची येरवडा परिसरात धिंड

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : येरवड्यातील गणेशनगर भागात कोयते उगारून आणि नागरिकांना शिवीगाळ करून दहशत माजविणाऱ्या दोघांना येरवडा पोलिसांनी अटक करून त्यांची दहशत माजवलेल्या परिसरात बुरखा घालून धिंड काढली. शैलेश राजू मोहिते (वय १९) आणि रितेश संतोष खुडे (वय १९, दोघे रा. लक्ष्मीनगर, येरवडा) अशी पोलिसांनी धिंड काढलेल्यांची नावे आहेत.

शैलेश मोहिते, रितेश खुडे व त्यांच्या इतर ५ अल्पवयीन साथीदारांनी ५ ऑगस्ट रोजी रात्री अकराच्या सुमारास येरवड्यातील गणेशनगर परिसरात नागरिकांना शिवीगाळ करून कोयते उगारले. तसेच घराच्या दरवाजावर कोयते आपटून दहशत निर्माण केली होती. याबाबतचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला होता. हा व्हिडीओ पाहून वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र शेळके यांनी कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यातील दोघांना अटक केली. इतर ५ जणांना बाल न्यायालयात हजर केले. दरम्यान, ज्या गणेशनगर भागात कोयते फिरवून दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला, त्याच भागात या पोलिसांनी मोहिते व खुडे याची बुरखा घालून धिंड काढली. यावेळी पोलिसांनी लोकांनी निर्भय होऊन गुंडगिरीला थारा न देता पोलिसांकडे तक्रार करण्याचे आवाहन केले.

## कॅमेरे बसविलेल्या वाहनातून फर्ग्युसन, जंगली महाराज रस्त्यावर गस्त

# एआय कॅमेऱ्यांद्वारे बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानावर आधारित (एआय) कॅमेरे बसविलेल्या वाहनांचा वापर करण्यास सुरवातकेली आहे. एआय कॅमेरे असलेले वाहन शहरातील जंगली महाराज रस्ता आणि फर्ग्युसन रस्त्यावर गस्त घालून बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करणार असून, वाहतूक नियमभंगाची दंडात्मक ऑनलाइन पावती (ई-चलन) वाहनचालकांना त्वरीत मोबाइल संदेशाद्वारे मिळणार आहे.

प्रुफ ऑफ कन्सेप्ट’ (पीओसी) या प्रायोगिक प्रकल्पाअंतर्गत एआय कॅमेरे बसविलेली पोलिसांचे वाहन शहरातील वेगवेगळ्या भागात गस्त घालणार आहे. या योजनेचा प्रारंभ मंगळवारी करण्यात आला. पोलीस आयुक्त अमितेशकुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, सहायक आयुक्त नंदानी वाग्याणी-पराजे या वेळी उपस्थित होते. एआय’ कॅमेऱ्यांद्वारे बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध




फर्ग्युसन रस्त्यावर कारवाई करण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या तीन महिन्यात फर्ग्युसन रस्त्यावर वाहतूक नियमभंग करणाऱ्या तीन हजार ९४९ वाहनचालकांवर कारावई करण्यात आली आहे.

प्रायोगिक तत्वावर एआय कॅमेरे बसविलेले एक वाहन जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्त्यावर गस्त घालणार आहे. या वाहनांवरील कॅमेरे बेशिस्त वाहनचालकांना टिपून त्यांच्यावर कारवाई करणार आहेत. वाहतूक नियमभंग केल्यानंतर त्वरीत दंडात्मक कारवाईचा संदेश वाहनचालकांना मोबाइलवर मिळणार आहे. प्रायोगिक तत्वावर सध्या जंगली महाराज आणि फर्ग्युसन रस्त्यावर एआय कॅमेरे बसविलेले वाहन गस्त घालणार आहे. त्यानंतर अशा प्रकारच्या वाहनांची संख्या वाढविण्यात येणार आहे. बेशिस्तांवर कारवाई, तसेच वाहतुकीला शिस्त लागण्यास मदत होणार आहे, असे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी सांगितले. या कॅमेऱ्यांमुळे रस्त्यावरचे वादविवाद कमी होतील, तसेच कारवाईही प्रभावी होईल.

## संक्षिप्त

### केवळ आधार, पॅनमुळे भारताचा नागरिक ठरत नाही

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : उच्च न्यायालयाने बांगलादेशातून बेकायदा मार्गाने आलेल्या व्यक्तीची जामिनावर सुटका करण्यास मंगळवारी नकार दिला. संबंधित व्यक्तीवर बनावट कागदपत्रांच्या आधारे एक दशक भारतात वास्तव्य केल्याचा आरोप आहे.

नागरिकत्व कायद्यातील तरतुदींमध्ये भारताचा नागरिक कोण असू शकतो आणि नागरिकत्व कसे मिळवता येते? हे नमूद केले आहे. आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र ही कागदपत्रे केवळ ओळख पटविण्यासाठी आहेत आणि सेवा मिळविण्याकरिता आहेत, न्या. अमित बोरकर यांच्या एकलपीठाने हे स्पष्ट केले. आरोपीवरील आरोप गंभीर आहेत. त्याने केवळ भारतात जास्त काळ वास्तव्य केले नाही, तर भारतीय असल्याचे भासविण्यासाठी बनावट ओळखपत्रे बनविली आणि ती वापरली, असे न्यायालयाने त्याचा जामीन फेटाळताना म्हटले. बाबू अब्दुल रौफ सरदार हा बांगलादेशी नागरिक भारतात बेकायदा मार्गाने घुसला. त्याच्याकडे पासपोर्ट किंवा टॅव्हल व्हिसा नव्हता. त्याने फसवणूक करून आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मतदान ओळखपत्र मिळविले, असा आरोप आहे.

’एखाद्याच्या नागरिकत्त्वाबाबत निर्णय घेण्यासाठी ’नागरिकत्व कायदा - १९५५’ हा मुख्य कायदा आहे. तो अधिकृत नागरिक आणि स्थलांतरीत यांच्यातील फरक स्पष्ट करतो. हा फरकच महत्वाचा आहे. कारण तो देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करतो. अधिकृत नागरिकांना मिळणारे फायदे आणि त्यांचे अधिकार बेकायदा लोक हिरावून घेणार नाहीत, याची हमी हा कायदा देतो, असे न्यायालयाने नमूद केले. आरोपी म्हणतो, मी भारतीयच मी भारताचा प्रामाणिक नागरिक आहे. मी बांगलादेशाचा नागरिक आहे, हे सिद्ध करण्यासाठी तपासयंत्रणेकडे कोणतेही निर्णायक पुरावे नाहीत. सर्व कागदपत्रे, आयकर नोंदी आणि व्यवसाय नोंदीशी जोडलेली आहेत. मी २०१३ पासून ठाणे जिल्ह्यात राहतो, असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलाने केला. तो न्यायालयाने अमान्य केला.

### ‘कबुतरखान्यावरून दादर तापले’

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : उच्च न्यायालयाने दादर इथला कबुतरखाना बंद करण्याचा आदेश दिला आहे. महापालिकेकडून त्याबाबतची अंमलबजावणी केली जात असली, तरी काही लोकांकडून न्यायालयाच्या आदेशाचे सर्रास उल्लंघन केले जात आहे. दादरच्या जैन मंदिराशेजारील एका इमारतीच्या छतावर दाण्याची पोती टाकली जात आहेत. तिथे हजारो कबुतरे जमा होत असून, त्याचा परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. न्यायालयाचा आदेश मान्य न करणाऱ्यांना जाब विचारण्यासाठी मराठी एकीकरण समिती मैदानात उतरल्याने हा वाद अधिकच पेटला आहे. या प्रकाराविरोधात मराठी एकीकरण समिती मैदानात उतरली असून, गोवर्धन देशमुख जाब विचारण्यासाठी रवाना झाले आहेत. यामुळे दादर येथे मोठा पोलिस बंदोबस्त वाढवला आहे. यामुळे परिसराला छावणीचं स्वरुप आलं आहे. राज्य राखीव पोलिस दलाची तुकडीदेखील येथे पोलिस बंदोबस्तात सहभागी झाली आहे.

# अग्रलेख : विरोधकांचा आयोगाविरोधात एल्गार जनक्षोभ वाढविणारा

बिहारमधील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल तपासणीला (एसआयआर) तीव्र विरोध दर्शवत आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचे गंभीर आरोप करत विरोधी इंडिया आघाडीच्या सदस्यांनी संसदेच्या मकर द्वारापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला आणि आयोगाविरुद्धचा आपला संताप व्यक्त केला. हा मोर्चा पोलिसांनी वाटेतच अडवला व काही खासदारांना ताब्यात घेतले. मात्र, निर्बंध असूनही अनेक नेते त्यावरून उडी मारून पुढे जाण्याचा प्रयत्न करताना दिसले. यावेळी आंदोलक खासदारांनी 'एसआयआर' आणि 'मतचोरी' असे लिहिलेल्या पांढ-या टोप्या घातल्या होत्या.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील या मोर्चात शरद पवार, मल्लिकार्जुन खरगे, सुप्रिया सुळे, प्रियंका गांधी, संजय राऊत (शिवसेना, उबाठा), अखिलेश यादव (समाजवादी पक्ष) यांच्यासह द्रमुक, राजद आणि डाव्या पक्षांचे खासदार सहभागी झाले होते. खासदारांनी निवडणूक सदन येथील निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे कूच करत असताना त्यांनी निवडणूक आयोगावर 'मतचोर'असल्याचा आरोप करत घोषणाबाजी केली. धरणे आंदोलनादरम्यान केंद्र सरकारवर टीका करताना अखिलेश यादव म्हणाले, ते आम्हाला रोखण्यासाठी पोलिसांचा वापर करत आहेत. सपच्या खासदार डिंपल यादव यांनी उत्तर प्रदेशातील अलिकडच्या पोटनिवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाच्या हाताळणीवर टीका केली. केवळ मतांचीच चोरी झाली नाही, तर मतदान केंद्रेही ताब्यात घेण्यात आली होती, असे त्या म्हणाल्या. मोर्चायावेळी संघर्ष निर्माण झाला. काही खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. राहुल गांधी व प्रियंका गांधी यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील २५ पक्षांचे ३०० खासदार या मोर्चात सहभागी होते. 'एक व्यक्ती, एक मत' यासाठी आमची लढाई असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. निवडणूक आयोग चर्चेला का घाबरत आहे? असा सवाल त्यांनी केला. आम्ही आज निवडणूक आयोगाला भेटणार होतो, पण इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांना थांबवण्यात आले. मतचोरीचे सत्य आता देशासमोर आहे. ही लढाई राजकीय नाही.

ही लोकशाही, संविधान आणि 'एक व्यक्ती, एक मत' या अधिकाराचे रक्षण करण्यासाठीची लढाई आहे. विरोधी पक्ष आणि देशातील प्रत्येक मतदाराची मागणी आहे, ती स्वच्छ मतदार यादीची. आम्ही हा अधिकार कोणत्याही परिस्थितीत मिळवू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवरून गंभीर आरोप करत नव्या आंदोलनाची सुरुवात केली आहे. राहुल गांधी यांनी 'मतचोरी' नावाची वेबसाईट सुरू केली असून नागरिकांनी आयोगावर दबाव टाकावा असे जनतेला आवाहन केले आहे. प्रत्येक भारतीयाच्या मतदानाच्या अधिकारासाठी विरोधक लढत आहेत. आम्हाला सुस्पष्ट आणि पारदर्शक मतदारयादी हवी आहे. आम्ही जी अनियमितता निदर्शनास आणून दिली आहे ती केवळ एकाच मतदारसंघातील नाही तर संपूर्ण देशातील आहे. या अनियमिततेचा लवकरच स्फोट होईल असे राहुल गांधी म्हणाले. आम्ही जी माहिती दिली आहे ती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरील आहे. ती आमची माहिती नाही. आपण केलेल्या आरोपानंतर सत्य संपूर्ण देशासमोर आले आहे.

या माहितीचा लवकर स्फोट होईल याची आयोगाला जाणीव आहे, असेही राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाचे अनेक अनियमित प्रकार सामान्य जनतेसमोर आणले आहेत. याबाबत सत्य काय आहे याचे संशोधन यथावकाश होईल, पण याबाबत निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण देणे अपेक्षित आहे. सामान्य माणसाला मतदान ओळखपत्र मिळवण्यासाठी वास्तव्याचे अनेक पुरावे सादर करावे लागतात, पण एकाच खोलीच्या पत्त्यावर असंख्य मतदारांचे वास्तव्य दाखवणे कोणत्या नियमात बसते? लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नसून ती मतदारांच्या विश्वासावर उभी आहे. या विश्वासाला तडा गेला तर संविधानातील आत्माच निघून जाईल. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर केलेले आरोप अतिशय गंभीर असून ते दुर्लक्षित करण्याजोगे नाहीत. त्यांनी महाराष्ट्र, हरियाणा आणि कर्नाटक राज्यातील मतदार याद्यांतील मतदान प्रक्रियेतील अनेक गोंधळांवर बोट ठेवले आहे.


त्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीचा हवाला दिला आहे. निवडणूक आयोगाकडून मतांची चोरी झाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांनी आयोग आणि सत्ताधारी भाजप या दोघांना एकाचवेळी आरोपीच्या पिंज-यात उभे केले आहे. मतांच्या चोरीविषयी आपले म्हणणे प्रतिज्ञापत्रावर सादर करा किंवा देशाची माफी मागा, असे निवडणूक आयोग म्हणत असेल तर येथे प्रश्न केवळ राजकारणाचा रहात नाही तर संस्थात्मक पारदर्शकतेचाही रहात नाही.निवडणूक आयोगावर विश्वास ठेवणे हा केवळ एक प्रशासकीय मुद्दा नाही तर तो लोकशाही टिकवून ठेवण्याचा कणा आहे. आयोगाने निवडणुका पारदर्शी व्हाव्यात यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असते. पण सध्या हाच आयोग संशयाच्या भोव-यात अडकत चालला आहे. आयोगावर टीका होते तेव्हा भाजपवाले ज्याप्रकारे आयोगाचे समर्थन करतात ते संशयास्पद वाटते. एकूणच काय, तर खाई त्याला खवखवे, यापद्धतीने भाजपची दडपशाही स्पष्ट होते.

# अलिशान घर; तरी मुंडेंना 'सातपुडा' बंगल्याचा मोह



## राजकारण

### अंजली दमानियांची सरकारला नोटीस; घर सोडण्यासाठी ४८ तास मुदत


राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्रीपदाचा राजीनामा देऊन पाच महिन्यांपेक्षा अधिक काळ लोटला आहे. मात्र असे असताना धनंजय मुंडे यांनी अद्याप सरकारचे 'सातपुडा' हे निवासस्थान रिकामं केलेलं नाही. मुंबईत आपल्याला कुठेही घर नसल्यामुळं बंगला सोडला नसल्याचे स्पष्टीकरण त्यांनी आधी माध्यमांशी बोलताना दिलं होतं. अशातच गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीवेळी उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांनी मुंबईत गिरगाव चौपाटीवर असलेल्या या घराचा उल्लेख केलेला आहे. हे घर सध्या वापरामध्ये नाही, अशी माहिती आहे. यामुळे आता पुन्हा एकदा धनंजय मुंडे चर्चेत आले आहेत.

दरम्यान याचं मुद्द्यावरून धनंजय मुंडे यांच्या विरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया या आक्रमक झाल्या आहेत. पुढच्या ४८ तासात घर खालीकरून सरकारने प्रलंबित ४६ लाखांचा दंड देखील वसूल करावा, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. दरम्यान या प्रकरणी सरकारला लीगल नोटीस पाठवणार असल्याचा पवित्राही त्यांनी घेतला आहे. त्यामुळे यावर प्रशासन नेमकं काय कारवाई करतं हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**नेमकं काय म्हणाल्या अंजली दमानिया?**

धनंजय मुंडे जेव्हा सरकारी बंगला वापरत होते तेव्हा ते पहिल्यांदा म्हणाले होते की, माझं मुंबईत घर नाही आणि मला तब्येतीमुळे आणि मुलीच्या शिक्षणामुळे मुंबईत राहणं गरजेचे आहे. तेव्हा देखील आपण म्हटलं होतं की त्यांनी घर भाड्यावर घेऊन राहावं. पण आता कायद्याप्रमाणे त्यांना सातपुडा बंगला खाली करणे भाग आहे, क्रमप्राप्त आहे. पण आत्ताच्या घटकाला आपल्याला दिसतंय की त्यांच्या २०२४ च्या एफिडेबिटवर वीरभवन नावाचा एक बिल्डिंग आहे. जिथे ९०२ नंबरचा फ्लॅट म्हणजे २१५१ स्क्वेअर फिटच्या बहुतेक तो चार बेडरूमचं घर असावं, तोच फ्लॅट मंत्री असताना देखील होता.

मात्र आजही सातपुडा बंगला ठेवणे हे अतिशय चुकीचा आहे. आम्ही आज एक लीगल नोटीस सरकारला पाठवणार आहे. जर ४८ तासात ते बंगला खाली करत नसतील आणि ४६ लाखाचा आत्तापर्यंत थकबाकी असलेले दंड आहे तो देखील देत नसतील तर आम्ही सरकारला प्रश्न करू. हा दंड देखील वसूल करण्यात यावा आणि तातडीने मुंडे यांची रवानगी त्यांच्या घरी करण्यात यावी. ४८ तासात त्यांनी ते घर खाली करावं, असा इशाराही अंजली दमानिया यांनी दिला आहे.

दरम्यान, याबाबत धनंजय मुंडे यांची पहिली पत्नी करुणा शर्मा यांनीही त्याला दुजोरा दिला आहे. धनंजय मुंडे यांच्यावर छळ आणि विविध प्रकारचे दावे करीत करुणा शर्मा यांनी पोटगीचा दावा केला होता. तो त्यांनी जिंकला आहे. त्यांना दहा लाखांहून अधिक मासिक पोटगी देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. परंतु अद्याप त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे;. त्यातच आता मंत्रीपद जावूनही सातपुडा हा शासकीय बंगला माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी चार महिने सोडलेला नाही. त्याचे ४२ लाख रुपये खर्च झाले आहेत. या वादात आता त्यांनीही उडी घेतली. धनंजय यांचे मुंबईत तीन फ्लॅट असल्याचं करुणा शर्मा यांनी म्हटलं आहे. मलबार हिल, पवई आणि सांताक्रुज येथे तीन फ्लॅट असल्याचा दावा करुणा शर्मा यांनी केला आहे. खोटं बोलून सरकारी बंगल्याचा लाभ घेत असल्याचा दावा करुणा शर्मा यांनी केला आहे. तरीही घर नसेल तर माझ्या सांताक्रुज येथील घरी धनंजय दोघे पती-पत्नी राहण्यासाठी या. मी दुसरीकडे भाड्याने घर घेऊन राहील. तुम्हाला पुन्हा मंत्रीपद शक्य नाही आमदारकी देखील जाईल, असे त्या म्हणाल्या.

### नेमकं काय म्हणाल्या करूणा शर्मा?

करुणा शर्मा म्हणाल्या, धनंजय मुंडे यांनी जनप्रतिनिधी असताना लाज सोडली आहे, मुंबईमध्ये स्वतःचं घर असताना आणि ते खोट्या गोष्टी सांगत आहे. ते म्हणतात माझी प्रकृती चांगली नाही. मुलीचं शिक्षण आहे. त्याच्यासाठी मी इथे राहतो. पण धनंजय मुंडे यांच्या मालाबार हिलमध्ये फ्लॅट आहे. हा सगळ्यांना माहिती आहे. त्यांच्या शपथ पत्रामध्ये त्यांनी त्याची माहिती दिली आहे. त्यांचा पवईमध्ये देखील एक फ्लॅट आहे. ज्या फ्लॅटमध्ये मी आत्ता राहत आहे तो देखील त्यांचाच आहे. तुम्ही मला दिलेला फ्लॅट तुमचाच आहे, माझा फ्लॅट आहे तो पण तुमचाच आहे. शासकीय निवासस्थान सोडा आणि माझ्या घरी राहायला या. मी तिथून बाहेर राहायला जाते. पण असं तुम्ही कधीही करणार नाही.

## अंतरंग



### कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विद्यापीठ प्रशासन

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विद्यापीठ प्रशासनात परिवर्तन घडवणारे साधन ठरत आहे. प्रवेश प्रक्रिया, हजेरी, शिष्यवृत्ती व विद्यार्थी प्रगती विश्लेषणात कार्यक्षमता वाढवता येते. एआयचा संतुलित व दूरदृष्टीपूर्ण वापर भविष्यातील शिक्षणाला नवी दिशा देईल.



आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही केवळ एक तांत्रिक संकल्पना राहिली नसून, ती शिक्षण आणि प्रशासन क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवणारे एक प्रभावी साधन बनले आहे. शिक्षण क्षेत्रात एआयची संकल्पना १९५६ मध्ये अमेरिकन संगणक वैज्ञानिक जॉन मॅकार्थी यांनी मांडली. पण आजही शिक्षण क्षेत्रात संशोधनाशिवाय प्रशासनामध्ये याचा वापर फारसा होताना दिसत नाही. विशेषतः भारतातील विद्यापीठांमध्ये प्रशासनात एआयचा वापर व्यवस्थापन अधिक परिणामकारक, कार्यक्षम आणि डेटा-साक्षर करण्यासाठी होऊ शकतो. प्रवेश प्रक्रिया, हजेरी व्यवस्थापन, शिष्यवृत्तीचे व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण यांसारख्या क्षेत्रांमध्ये एआयचा वापर वाढवण्याची खूप गरज आहे. पण त्याचबरोबर डेटा गोपनीयता, नैतिकता, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळाच्या नव्या कौशल्यांचा विकास ही आव्हानेही समोर उभी आहेत. नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि एआय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एनईपी २०२०) हे भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्याचा प्रयत्न करत आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता एक महत्त्वाचा भाग मानला गेला आहे. या धोरणात विद्यापीठ प्रशासन आणि शिक्षण व्यवस्थेमध्ये एआयला पूरक ठरतील असे अनेक बदल प्रस्तावित आहेत : एनईपी २०२०मध्ये ऑनलाइन शिक्षण, मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्सेस आणि ब्लेंडेड लर्निंगला मान्यता दिली आहे. यामुळे एआय आधारित वैयक्तिकृत शिक्षण शक्य होईल. विद्यार्थ्यांना एआय, डेटा सायन्स, ब्लॉकचेन यांसारख्या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश केला जात आहे, जे शिक्षणाच्या नव्या गरजा पूर्ण करेल. विद्यार्थी कामगिरी, प्रवेशाचे ट्रेंड्स, संमेलनातील सहभाग अशा डेटाचे एआयच्या मदतीने विश्लेषण करून धोरणात्मक निर्णय अधिक अचूक आणि गतिमान करता येतील. कस्टमाइज्ड लर्निंग पाथ या संकल्पनेनुसार, एआय तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम आणि प्रगती अधिक चांगल्या प्रकारे ट्रॅक करता येईल. प्रशासनाचे ऑटोमेशन: प्रवेश प्रक्रिया, विद्यार्थी नोंदणी, शिष्यवृत्ती अर्ज, हजेरी व्यवस्थापन यांसारख्या कामांमध्ये एआयचा वापर केल्यास कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होईल. एनईपी २०२०मध्ये नवीन संशोधन संस्थांची स्थापना सुचवली आहे, जिथे एआय-आधारित संशोधनाला विशेष प्राधान्य दिले जाईल. हे सर्व बदल करताना विद्यापीठ प्रशासनासमोर काही आव्हाने उभी राहू शकतात.

**परदेशी विद्यापीठांमध्ये एआयचा वापर**

अमेरिका : येथे उच्च स्तरावरील डेटा विश्लेषण, नैतिक एआय धोरणे, प्रवेश प्रक्रिया आणि संशोधन सहाय्य यावर काम चालू आहे. युरोप (ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स) : गोपनीयता, नैतिकता, प्रवेशातील पूर्वग्रह टाळणे आणि विद्यार्थ्यांचा समावेश सुनिश्चित करणे यावर भर दिला जात आहे. ऑस्ट्रेलिया : येथे एआय सहाय्यक शिक्षण मॉडेल्सचा वापर, स्मार्ट क्लासरूम आणि स्वयंचलित मूल्यांकन प्रणालींमध्ये केला जात आहे. कॅनडा : विद्यार्थ्यांचे आरोग्य व कल्याण वाढवण्यासाठी एआयचा वापर केला जात आहे, ज्यात मानसिक आरोग्य आणि वैयक्तिक प्रगती ट्रॅकिंग यांचा समावेश आहे. सिंगापूर आणि कोरिया : येथील अभ्यासक्रमांमध्ये वैयक्तिकृत मार्गदर्शनासाठी एआय-आधारित निर्णय प्रणाली वापरल्या जात आहेत. अमेरिका व युरोपमधील देश नैतिक एआय आणि डेटा गोपनीयतेवर अधिक लक्ष देत आहेत, तर ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा विद्यार्थ्यांचे कल्याण आणि शिक्षण पद्धती सुधारण्यासाठी एआयचा वापर करत आहेत. भविष्यातील दिशा : भविष्यात विद्यापीठ प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्ता एक अविभाज्य भाग बनणार आहे. विद्यापीठांमध्ये स्मार्ट सेन्सर्स, एआय-आधारित सुरक्षा प्रणाली आणि ऊर्जा व्यवस्थापनासाठी स्वयंचलित तंत्रज्ञान वापरले जाईल. विद्यार्थी यश, ड्रॉपआऊट्सची शक्यता आणि कर्मचारी कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. एआयच्या मदतीने प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या अभ्यासपद्धतीनुसार विशिष्ट कोर्सेस आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध होतील. प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती मंजुरी आणि अभ्यासक्रम निवड यांसारख्या कामांमध्ये मानवी हस्तक्षेप कमी होऊन एआय-आधारित निर्णय प्रणाली सक्रिय होतील. एआयच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या नैतिक प्रश्नांसाठी विद्यापीठांना नवीन आचारसंहिता आणि धोरणे विकसित करावी लागतील.

**- संजीव सहस्त्रबुद्धे**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८१ श्रावणशके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम अयन- दक्षिणायान
मास- श्रावण ऋतु- सौर वर्षा कृष्ण पक्ष
तिथि : षष्टी २६:०७:२६+ नक्षत्र : रेवती ०९:०५:४५
योग : शूल १३:११:४६ करण:गर १५:१५:५९ करण : वणिज
२६:०७:२६+सूर्य : कर्क चन्द्र : मेष०९:०५:४५ हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास -सफर
तारीख - १९ विशेष बृहस्पती पूजन पतेती

## राशी भविष्य...

**मेष** : योजनेनुसार काम केल्यास फायदा होईल. आई वडिलांशी असलेले संबध दृढ होतील. व्यापारात स्पष्टपणा राखा. व्यापार नोकरीत इच्छेप्रमाणे उन्नती होईल. वाचनाची गोडी वाढणार आहे.

**वृषभ** : एखादी आनंदाची बातमी मनाची प्रसन्नता वाढवील. मुलांसंबंधातील कामात प्रगती होईल. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करु नका. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील.

**मिथुन** : शुभ, मंगल आणि धार्मिक कार्यात पैसे खर्च होतील. नोकरी, राज्यपक्षात अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. घरात एखाद्याशी मतभेद होतील. सन्मान, यश मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क** : प्रतिष्ठित लोकांशी भेटी हातील ज्याचा फायदा भविष्यात आपल्याला मिळेल. वादांपासून स्वतःला दूर ठेवा. उद्योगधंदा, रोजगाराच्या क्षेत्रात प्रगती होईल. कौटुंबिक सुख मिळेल.

**सिंह** : उद्योगधंदा साधारण राहील. प्रयत्न अधिक केल्यास कामात जास्तीचे यश मिळू शकते. आर्थिक परिस्थिती चिंता वाढवणारी राहील. भावांशी सलोख्याचे संबंध राहतील.

**कन्या** : प्रसन्न वातावरण असल्यामुळे आपण केलेले प्रयत्न यशस्वी राहतील. चोरी किंवा नुकसान होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील. व्यापारात घेतलेले निर्णय फायदेशीर असणार आहेत.

**तूळ** : आपले प्रयत्न यशस्वी होतील. सन्मान व किर्तीत वाढ होईल. खर्च विचारपूर्वक करा. सरकारी कामे पार पडतील. कुटुंबात शुभ कार्याची चर्चा होऊन रूपरेषा आखली जाईल.

**वृश्चिक** : निंदा करण्यापासून दूर रहा. कामकाजात निर्माण झालेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांशी वाद होण्याचा संभव आहे. हाती कमी पैसा असल्याने आपले काम अपूर्ण राहण्याची शक्यता आहे.

**धनू** : रोजगारामध्ये बदल किवा नवीन संधी मिळतील. प्रत्येक कामात आपल्याला यश मिळेल. जीवनसाथीच्या भावनेकडे दुर्लक्ष करू नका. आधिकारी लोक आपल्याला सहकार्य करतील.

**मकर** : विनम्रतेने आणि सामंजस्याने कामे केल्यास प्रत्येक कामात यश मिळण्याचा योग आहे. भागीदारीत वेळेवर घेतलेले निर्णय फायद्याचे होईल. वाहनाने इजा पोहचण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सरकारी कामे वेळेवर पूर्ण होण्याची शक्यता आहे. मौजमजा करण्याकडे कल वाढेल. विनाकारण कोणावरही संशय येऊ शकतो. मिळकतीचे स्थायी स्त्रोत वाढतील.

**मीन** : नशिबावर सोडून दिलेली कामे पार पडतील. आर्थिक फायदा होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील.

## पारावरचा फड



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निमित्ताने असो वा सत्तेची कास, अनेक माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी कॉँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादीतून सांगली जिल्ह्यात भाजपपाठोपाठ अजितदादा राष्ट्रवादीतही प्रवेश केला. कोल्हापूरमध्ये तर शिवसेना शिंदे गटातही प्रवेश केला. अजूनही प्रवेशसोहळे सुरुच असून, दोन्ही पक्षाची दारे उघडीच असल्याचे दिसून येत आहे. अर्थात त्यामुळे हे पक्ष संपतील अशा आशा आणि निवडणूक सोपी झाल्याची भाषा सत्ताधाऱ्यांकडून सुरू असली तरी विरोधी मतदान फिक्स आणि ते विरोधात राहणार हेही निश्चित आहे. त्यामुळेच कॉँग्रेसची खालची फळी वर सरकत आहेच, तर काहीजणांनी याच हेतूने आगामी निवडणुकीत सोशल इंजिनिअरिंगमधून मतांचे ध्रुवीकरण आपला 'करेक्टर कार्यक्रम' करायला कारणीभूत ठरेल म्हणून पक्षांतर टाळत आहेत. अर्थात काही नेत्यांनीच पक्षांतर केल्याने अनेकांवरील कारवाईचे गंडांतर टळलेच आहे, दुसरीकडे त्यांना आता जिल्हाध्यक्षपदाच्या संधी खुणावू लागल्याने ते आनंदात आहेत. याबाबत पारावरची चर्चा!

**पांडूनाना :** भाजपचं नेतं कांगरेस संपिवली, शरद पवार गटाचं नेतं जयंतरावास्नी संपिवलं आशी भाषा करत हुतं, पन तसं काय दिसत न्हाय गा.

**बाबूराव :** म्हजी?

**पांडूनाना :** बग न्हवं, भाजप परवेशानंतर आजितदादा बी दौऱ्यावं येत हुतं सांगलीच्या. त्यासाटी आजितदादासमोर दाकवाया कांगरेस, जयंतराव समरथकास्नी आजित दादांकडं गेल्यालं नवं नेतं गळ घालाय लागल्याती. पन कुनी हाताला लागंना...!

**बाबूराव :** खराय तुजं, त्येचं बी कारन हाय. ईरोदी मतं बी फिक्स आसत्यात. त्ये सोशाल इंजिनिअरिंग का काय म्हंत्यात त्यातनं. म्हनूनच सांगली, मिरजेतली लोकं हाय तितंच बरं म्हंत्यात. काहीजन दारातनं परतल्यात.

**पांडूनाना :** खराय बग. आता कांगरेसमदी ज्याच्या इरोदात काम केला त्यो नेता बी गेला आन् त्येंच्या नेत्या जयशरीताई बी गेल्या. त्यामुळं उरलेल्यास्नी कांगरेसचं रान पोकळं हाय. जयंतरावांकडं बी तसंच हाय.


**बाबूराव :** व्हय, त्यातनंच आता कांगरेसच्या शहर जिल्हाद्यक्शपदासाटी आनेकजन फिलडींग लावाय लागल्याती. येवडंच काय, कांगरेसभाईर गेल्यालं नेतं बी आता मला पद द्या म्हनत फिलडींग लावत्याती.

**पांडूनाना :** आरं कांगरेस कशाला म्हंत्यात. ते कदीच संपत न्हाय.

**बाबूराव :** म्हजी इलेक्शानमदी इरोदक सक्शम हुनारच.

**पांडूनाना :** म्हनून तर ईशवजित, ईशाल आन् जयंतराव बी निरधास्त हायती. ह्यांची आगाडीची गाडी चालनारच हे त्येंनाबी चांगलंच म्हाईत हाय. **- अमृत चौगुले**


## उपदेश कथा



**जिद्द**

डॉ. येलप्रगदा सुब्बाराव हे आंध्र प्रांतातील एक विख्यात वैद्य होते. त्यांच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. त्यांच्या भावाचा मृत्यू स्प्रू म्हणजे प्रवाहिका नावाच्या रोगाने झाला. त्यावर त्यावेळी औषध नसल्याने ते औषध तयार करण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली व ती शेवटी सिध्दीस नेली. मद्रास विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. मित्रमंडळींच्या सहाय्याने ते इंग्लंडला गेले. लंडन विद्यापीठात प्रवेश केला. नंतर अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवून १९३० मध्ये त्या विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. तेथे सुध्दा पैशाच्या अडचणीमुळे हॉस्पिटलमध्यो शिपायाचे काम करणे, प्रयोगासाठी बेवारशी कुत्री व मांजरे पकडणे वगैरे हलकी कामे करावी लागली पण त्यांनी त्यात कमीपणा मानला नाही. दूध व शिजवलेले पावटे हा त्यांचा आहार होता. लॅडर्ली लॅबोरेटरीचे १९४२ मध्ये प्रमुख झाले. टेरॉटटेरिन व ॲमिनॉप्टिरिन नावाची कर्करोगावर व ल्युकेमियावर उपयोगी पडणारी औषधे त्यांनी तयार केली. लेडर्ली संस्थेतील वाचनालयास व भारतातील त्या कंपनीच्या कारखान्यास त्यांचे नाव देण्यात आले.

## दिनविशेष...



**अंतराष्ट्रीय**

१०४० - मॅकबेथने स्कॉटलंडचा राजा डंकन पहिल्याची हत्या केली. शेक्सपियरने लिहिलेल्या मॅकबेथ नाटकातील प्रमुख पात्र यावर आधारित आहे.
१८४० - दुसरे सेमिनोल युध्द- अमेरिकेतील सेमिनोल जमातीचा पराभव व फ्लोरिडातून ओक्लाहोमा येथे सक्तीचे स्थलांतर.
१८४८ - ओरेगॉनला अमेरिकेचा प्रांत म्हणून मान्यता.
१९१२ - अमेरिकेच्या सैन्याने निकाराग्वावर आक्रमण केले.
१९२१ - तन्नु तुव्हा या राष्ट्राची रचना.
१९४५ - जपानने दोस्त राष्ट्रांची शरणागतीची कलमे मान्य केली.
१९४७ - पाकिस्तानला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९७१ - बहरैनला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९७२ - पूर्व जर्मनीचे आय. एल. ६२ प्रकारचे विमान पूर्व बर्लिनच्या विमानतळावर कोसळले. १५६ ठार.
१९८० - लेक वालेंसाने ग्डान्स्क जहाजबांधणी केंद्रातील संप पुकारला.
२००५ - हेलियोस एरवेझ फ्लाईट ५२२ हे बोईंग ७३७ प्रकारचे विमान अथेन्स जवळ कोसळले. १२१ ठार.
२००६ - इस्राईल व लेबेनॉनमध्ये युध्दबंदी लागू.
२००६ - श्रीलंकेच्या म्रुईतिवू जिल्ह्यात एका अनाथलयावर केलेल्या श्रीलंका वायुसेनेच्या हल्ल्यात ४२ विद्यार्थीनी ठार झाल्या.

## संस्कृतीला धक्का नको

आपली संस्कृती ही महान आहे व या संस्कृतीनं ज्याही प्रथा पुर्वी आणल्या होत्या. त्या आणताना समाजातील लोकांचा विचार करून त्यांच्यावर चांगले परिणाक्म व्हावेत म्हणून आणल्या होत्या. ज्यातून त्यांचा उद्देश संस्कृती बदनाम होवू नये हा होता. आज त्या प्रथा नाहीत. कारण त्या जुन्या प्रथा होत्या. परंतु आज त्या प्रथा बंद झाल्याने आजचे नराधम पिसाळत चालले आहेत. म्हणून आजच्या काळात कोणावरही केव्हाही लोकांची वाईट नजर पडत आहे. आज त्यांच्या नजरेतून अगदी चार वर्षाच्या बालिकाही सुटत नाहीत. अन् हे सगळं घडतं पाश्चिमात्य देशाच्या संस्कृतीचा अंगीकार केल्यानं. ते तिकडे वातावरण दमट आहे म्हणून तोकडे कपडे वापरतात आणि आपल्या देशात फॅशनच्या नावाखाली आपण तोकडे कपडे वापरतो. तिकडे याला सामान्य समजलं जातं. आपली संस्कृती आपल्याला तसं शिकवीत नाही. ज्यातून संस्कृती बदनाम होत नाही. परंतु बालविवाह, देवदासीप्रथा बंद झाल्यानं व पाश्चिमात्य संस्कृतीच्या अनुषंगानं तोकडे कपडे आपल्या संस्कृतीतील लोकं वापरत असल्यानं आजच्या लोकांचे लक्ष ते तोकडे कपडे विचलीत करतात. ज्यातून संस्कृती बदनाम होत चालली आहे. हे सगळं जुन्या प्रथा बंद झाल्यानं नाही तर पाश्चिमात्य संस्कृतीचा अंगीकार केल्यानं होत आहे.

**-महेश पाटील,सांगली**

## जन की बात...



### ध्वजसंहितेचे पालन करून तिरंगा फडकवावा!

यावर्षी आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे. या हजारो, लाखो ज्ञात- अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्ट पासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे. घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. देशाचे मानचिन्ह म्हणजे तिरंगा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंगा अभिमानाने फडकावून तिरंग्याला मानवंदना देणे हे आपले कर्तव्यच आहे. १३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी. घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. ध्वज फडकवताना केशरी रंग वरच असावा कोणत्याही परिस्थितीत तो तळाशी राहणार नाही याची काळजी घ्यावी.

**- अजिंक्य भोसले, सांगली**

## निसर्गाची अवकृपा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाच्या लहरीपणा वाढत चालला आहे निसर्गाचा लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पूर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो आहे. वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही. पाऊस आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे.

**-संग्राम माने, सांगली**

# शिरूरचे तिहेरी आमरण उपोषण मुंबईत धगधगले

## भ्रष्टाचार, शैक्षणिक अन्याय व पोलिसांच्या त्रासाविरोधात तीन स्वतंत्र आंदोलने

■ जनप्रवास प्रतिनिधी

जांबूत : शिरूर तालुक्यातील तिघा उपोषणकर्त्यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व न्यायविषयक मागण्यांसाठी बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. या तिन्ही उपोषणांना भिन्न कारणे असून, सर्वांनी आपापल्या मागण्यांवर शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी भूमिका घेतली आहे.

बहुजन मुक्ती पार्टीचे भ्रष्टाचाराविरोधातील उपोषण.

बहुजन मुक्ती पार्टीचे शिरूर शहर सचिव सागर बंडू घोलप यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या भ्रष्ट कारभाराविरोधात बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

प्रमुख मागण्या तत्कालीन आयुक्तांची पुराव्याआधारे चौकशी करून दोषी आढळल्यास सेवेतून मुक्त करणे व फौजदारी गुन्हा दाखल करणे.

शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या पीएमआरडीएवर उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करणे.बांधकाम मजुराच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या बांधकाम विकासकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणे.विकासकाने ओपन स्पेस विकसित न केल्यास ती स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरित करून विकसित करणे. निकृष्ट बांधकाम व पार्किंग जागा विक्री करणाऱ्या विकासक व परवानाधारक अभियंता सागर . कौठावळे यांच्यावर कारवाई.

मौजे शिरूर गट क्रमांक ७०६/२ मधील धोकादायक इमारतीचे सरकारी स्ट्रक्चरल ऑडिट.

भारतीय बहुजन पालक संघाचे शैक्षणिक अन्यायाविरोधातील उपोषण.




भारतीय बहुजन पालक संघाचे राज्य संयोजक नाथाभाऊ शिवराम पाचर्णे व अन्य पालक पदाधिकाऱ्यांनी शिरूर तालुक्यातील दहा खाजगी शाळांच्या मनमानी शुल्कवाढीविरोधात उपोषण सुरू केले आहे.प्रमुख मागण्या संचालक शिक्षण विभाग, पुणे यांनी प्रस्तावित दहा खाजगी शाळांची मान्यता रद्द करून कायदेशीर कारवाई.

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून पालकांकडून घेतलेले वाढीव शुल्क परत करणे.संबंधित शाळा शासन ताब्यात घेऊन शिक्षण विभागामार्फत चालविणे.

अल्पवयीन मुलीचे पोलिस त्रासाविरोधातील उपोषण. केवळ १४ वर्षीय सायली सागर घोलप हिने शिरूर पोलीस स्टेशनकडून होत असलेल्या अन्यायकारक त्रासाविरोधात आणि गृहमंत्र्यांच्या भूमिकेविरोधात प्राणांतिक आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.प्रमुख मागण्या पोस्को प्रकरणातील इतर सहभागींची पुराव्यानुसार सहआरोपी म्हणून नोंद.

पीएसआय अभिजीत पवार व तपासी अधिकारी पाटील यांची खातेनिहाय चौकशी.

२०२१ मधील बिल्डरविरोधी तक्रारीची दखल न घेतल्याबद्दल डीवायएसपीवर चौकशी. बोगस कर्ज प्रकरणातील तक्रारीची दखल का घेतली नाही याची चौकशी. खोट्या गुन्ह्यात दाखवलेल्या ४० लाख रकमेची आयकर विभागाकडून चौकशी.

संपूर्ण प्रकरणाची सत्यता बाहेर काढण्यासाठी स्वतंत्र समितीची स्थापना.

तीन वेगवेगळ्या मुद्द्यांवर आधारित ही उपोषणे एकाच वेळी आझाद मैदानावर सुरू झाल्याने शासन, प्रशासन आणि पोलीस यंत्रणेसमोर तातडीने कार्यवाही करण्याचे आव्हान उभे राहिले आहे. उपोषणकर्त्यांनी ठामपणे जाहीर केले आहे की, त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण मागे घेण्यात येणार नाही.

# रणछोडदास कल्याणदास शहा विद्यालयात गणवेश वाटप

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश रणछोडदास शहा यांच्या मार्फत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने १५ ऑगस्ट निमित्त मोफत गणवेश वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वृक्षमित्र चंद्रकांत देवकर (नाना) हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सौ. सायरा आत्तार व हमीद आत्तार उपस्थित होते . पंचायत समितीचे माजी विस्तार अधिकारी पुष्पराज जमदाडे साहेब, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हुसेन मुलानी, ओमकार गिरीश शहा, अशोक अनपट नाना, शहाजहान अमीर शेख, वसीम शब्बीर शेख, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य शालेय परिसरातील पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

१५ ऑगस्ट च्या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांना नवीन गणवेश मिळावा या हेतूने शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने गणवेश वितरण करण्यात आले.



यावेळी भगवानराव खारतोडे साहेब यांच्यावतीने मुलांना शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी ठज वॉटर प्युरिफायर देण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत देवकर नाना यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या संत तुकाराम महाराज यांच्या वृक्ष वरील प्रेमाचे महत्त्व समजून सांगितले. वृक्ष तसेच मुले आपल्या सर्वांना आवडतात. त्यांना आपण प्रेमाने जपले पाहिजे असे सांगितले. यावेळी सौ. सायरा हमीद अत्तार यांनी आर. के. काका यांच्या जुन्या आठवणी मुलांना सांगितल्या. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश शहा साहेब यांनी मुलांना आणि पालकांना मुलांनी शाळेत शिक्षण घ्यावे आणि खूप मोठे व्हावे असे मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# अंधविश्वासातून निर्दयी विश्वासघातापर्यंत, हंगामा ओटीटी चा लेट्स प्ले ब्लाइंड

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटी ने १२ ऑगस्ट २०२५ रोजी आपली नवीनतम ओरिजनल मालिका लेट्स प्ले ब्लाइंड प्रदर्शित केली. शहरातील सर्वात खास क्लबमध्ये घडणारा हा थरारक ड्रामा महत्त्वाकांक्षा, फसवणूक आणि जगण्यासाठीची झुंज दाखवतो, ज्यात युक्ती कपूर, अक्षित सुघीजा, डॉली चावला, कंगना शर्मा, एमी एला आणि रिभ्बू मेहरा यांनी प्रभावी भूमिका साकारल्या आहेत.

आकर्षक पण धोकादायक मोठ्या दावाच्या जुगाराच्या जगात लेट्स प्ले ब्लाइंड ही कथा तीन श्रीमंत महिलांभोवती फिरते, ज्या शहरातील उच्चभ्रू कार्ड खेळांच्या गटावर राज्य करतात. त्या नि:शंक महत्त्वाकांक्षी आहेत आणि भूतकाळाच्या आठवणींनी त्रस्त आहेत.

# अभय भुतडा फाऊंडेशनकडून शिवसृष्टीला आणखी ७५ लाख रुपयांची मदत

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : पुणे– शिवसृष्टी थीम पार्कला पूर्वी दिलेल्या ५० लाख रुपयांच्या देणगीमुळे पार्कमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटक येऊ लागल्यानंतर, अभय भुतडा फाउंडेशनचे संस्थापक आणि अध्यक्ष अभय भुतडा यांनी शिवसृष्टीला ७५ लाख रुपयांची अतिरिक्त मदत दिली आहे.

अभय भुतडा फाऊंडेशनने थीम पार्कला आणखी ७५ लाख रुपयांची मदत केली आहे. यावर्षीच्या सुरुवातीला फाऊंडेशनने ५० लाख रुपये दिल्यामुळे १५ मे ते १५ ऑगस्ट दरम्यान तिकिटाचे दर फक्त ५० रुपये ठेवता आले. या काळात दीड लाखांहून अधिक लोकांनी या सवलतीचा लाभ घेतला. जनतेच्या मोठ्या मागणीनुसार आणि फाऊंडेशनकडून मिळालेल्या या नव्या ७५ लाख रुपयांच्या मदतीमुळे आता सवलतीचे तिकिट दर ३१ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहेत.

# महाराष्ट्रातील सौर ऊर्जेच्या विविध योजनांची अंमलबजावणी व यश इतर राज्यांसाठी आदर्श

## केरळचे अपर मुख्य सचिव श्री. पुनीत कुमार




■ जनप्रवास प्रतिनिधी

मुंबई : गेल्या अडीच वर्षांमध्ये महाराष्ट्रात महावितरणने सौर ऊर्जे च्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे वीजदर कपातीसह शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा, घरगुती ग्राहकांना सौर दिवसा वीज दरात सवलत तसेच क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक वीज दरात घट होण्यास सुरवात झाली आहे. सौर योजनांची ही अंमलबजावणी व फलनिष्पत्ती इतर राज्यांसाठी आदर्श आहे, असे गौरवोद्गार केरळ राज्याचे अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्री. पुनीत कुमार यांनी बुधवारी (दि. १३) काढले.

महाराष्ट्रातील विविध सौर ऊर्जा योजनांची अंमलबजावणी व माहिती घेण्यासाठी श्री. पुनीत कुमार यांनी महावितरणच्या ‘प्रकाशगड’ मुख्यालयास भेट दिली. यावेळी आयोजित बैठकीत अपर मुख्य सचिव (ऊर्जा) सौ. आभा शुक्ला व महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी विविध सौर योजनांमुळे सन २०३० पर्यंत राज्याच्या वीजक्षेत्रात होणारे आमुलाग्र बदल, ग्राहकाभिमुख फायदे, वीज दर कपात, आर्थिक गुंतवणूक व रोजगार संधी आदींची माहिती दिली. यावेळी संचालक श्री. सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) उपस्थित होते.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या वीज क्षेत्रासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार करण्यात आला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यामध्ये सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत.

तसेच पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल व त्यायोगे सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहे अशी माहिती अपर मुख्य सचिव सौ. शुक्ला यांनी दिली.

# ‘ग्लोबल गणेश फेस्टिवल २०२५’च्या अध्यक्षपदी एकनाथ शिंदे, स्वागताध्यक्षपदी चंद्रकांतदादा पाटील

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : गौरवशाली परंपरा असलेल्या पुण्याचा गणेशोत्सवाला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक करण्यासाठी ग्लोबल गणेश फेस्टिवलचे आयोजन केले आहे. यंदा फेस्टिवलचे दुसरे वर्षआहे. फेस्टिवलच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे. ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२५ च्या अध्यक्षस्थानी यंदा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, स्वागताध्यक्षपदी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची, तर ’मार्गदर्शन समिती’च्या प्रमुखपदी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर ट्रस्टचे खजिनदार महेश सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे. ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२५ चे कार्यकारी अध्यक्ष वैभव वाघ यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी फेस्टिव्हलचे मुख्य समन्वयक अनिरुद्ध येवले, आंतरराष्ट्रीय समन्वयक धनश्री पाटील, समन्वयक महेश साने, कार्यकारी अधिकारी ऋषिकेश कायत, प्रसिद्धीप्रमुख जीवराज चोले, सांस्कृतिक प्रमुख प्रणव भुरे आदी उपस्थित होते.

वैभव वाघ म्हणाले, ‘‘पुण्याच्या सार्वजनिक गणेशोत्सवात देशविदेशातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढावी, गणेशोत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक पद्धतीने जावा, यासाठी पुण्यातील गणेशोत्सव आयोजनात अग्रस्थानी असलेल्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून गेल्यावर्षीपासून या फेस्टिवलचे आयोजन केले जात आहे.

जागतिक गणेश मंडळे व पुण्यातील गणेश मंडळांचा सामंजस्य करार घडवून आणण्यावर भर दिला जाणार आहे. यानिमित्ताने जागतिक स्तरावर विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे. धार्मिक पर्यटन विकसित करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा उभारण्याची गरज आहे. ’मोरया हेल्पलाईन’द्वारे परदेशातून येणाऱ्या पर्यटकांना धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी सहकार्य केले जात आहे.‘‘

# सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

■ जनप्रवास प्रतिनिधी

लोणीकंद : डोंगरगाव (ता. हवेली) येथे सासरकडून होत असलेल्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून १९ वर्षीय विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

राणी मुंजाजी घाडगे (वय १९) असे मृत विवाहितेचे नाव असून, या प्रकरणी लोणीकंद पोलिसांनी पती भागवत अंकुश कदम (वय २४) आणि सासू मुक्ता अंकुश कदम (वय ४५) यांना अटक केली आहे.

लोणीकंद पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लग्नानंतर पती भागवत कदम पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत असे. पती व सासूने एकत्रितपणे तिच्यावर शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. या सततच्या जाचाला कंटाळून राणीने आत्महत्या केली. याप्रकरणी राणीचा मामा महादेव पांडुरंग कदम (वय ४१, रा. साईनगर, चंदननगर, मूळ रा. ओम नगर, गंगाखेड, जि. परभणी) यांनी पती व सासूच्या विरोधात

फिर्याद दिली. त्यानुसार लोणीकंद पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजया वंजारी करत आहेत.

# हर घर तिरंगा अभियानास इंदापूरात उत्स्फूर्त प्रतिसाद : मुख्याधिकारी रमेश ढगे

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : इंदापूर नगरपरिषदेच्यावतीने हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता स्पर्धा व अभियानांतर्गत शहरात विविध देशभक्तीपर व जनजागृतीचे उपक्रमाचे आयोजित करण्यात आले, या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे, अशी माहिती मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी दिली आहे.

शहरात ७ ऑगस्ट रोजी विद्या प्रतिष्ठान येथे वृक्ष लागवड, नागरिकांना हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता अभियानाची माहिती देऊन देशभक्ती व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ८ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद शाळा क्र. २ येथे स्वच्छता कर्मचारी यांचा गुणगौरव, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या अमृत वाटिका येथे विविध संस्था, नागरिक, कर्मचारी व अधिकारी यांच्या सहभागातून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले.नगरपरिषद कार्यालयापासून ४० फूट रोड –दर्गा




मज्जिद चौक –नेहरू चौक – बाबा चौक मार्गे पुन्हा नगरपरिषद असा मार्ग घेत भव्य दुचाकी रॅली काढण्यात आली. नारायणदास रामदास हायस्कूल येथे प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली.

शहरात ११ ऑगस्ट नारायणदास रामदास हायस्कूल येथे राखी स्पर्धा आणि १२ ऑगस्ट रोजी नारायणदास रामदास हायस्कूल येथे रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. नगरपरिषद प्रांगणात शहरातील बचत गट व महिला यांच्या सहभागातून रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. महिलांनी स्वच्छता व देशभक्तीचा संदेश देणाऱ्या रांगोळ्यांद्वारे सुंदर कलाकृती साकारल्या.

या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांपासून नागरिक, कर्मचारी, महिला बचत गट, विविध संस्था यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, देशभक्ती आणि सामूहिक जबाबदारी यांचे प्रभावी संदेश देण्यात आले. हर घर तिरंगा, घरघर तिरंगा अभियानांतर्गत इंदापूर शहरात घेतलेले हे विविध उपक्रम नागरिकांमध्ये राष्ट्रीय अभिमानाची भावना, स्वच्छतेचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणारे ठरले आहे, अशी माहिती श्री. ढगे यांनी दिली आहे.

## संक्षीप्त वृत्त

### माळवाडगाव परिसरात साथीच्या आजाराचे थैमान

■ जनप्रवास प्रतिनिधी

माळवाडगाव : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव परिसरात मागील पंधरा दिवसापासून साथीच्या आजाराने मोठ्या प्रमाणात थैमान घातले असून यामुळे शाळकरी मुले देखील मोठ्या प्रमाणात साथीच्या रोगामुळे आजारी पडत आहे तरी प्रशासनाने साथरोग प्रतिबंधक उपयोजना कराव्यात अशी मागणी ग्रामस्थांमधून केली जात आहे. माळवाडगाव परिसरात साथीच्या आजाराने मोठ्या प्रमाणात थैमान घातले असून सर्वच रुग्णालयात माळवाडगाव परिसरातील शाळकरी मुले वयोवृद्ध नागरिक उपचार घेता येत माळवाडगाव प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये देखील मोठ्या प्रमाणात साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव जाणवत असून रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे तरी प्रशासनाने सात रोग नियंत्रणात आणण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

### कै. दगडू आसने यांचे निधन

■ जनप्रवास प्रतिनिधी



माळवाडगाव : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव येथील जुन्या पिढीतील आकारी पडीत कार्यकर्ते कै. दगडू बाजीराव आसने यांचे वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, एक भाऊ, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

### सर्जेराव राऊत यांचे निधन

■ जनप्रवास प्रतिनिधी



टाकळीभान : श्रीरामपूर येथील सर्जेराव काशिनाथ राऊत वय (८७ वर्ष) यांचे वृद्धाप काळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पटेल हायस्कूलचे शिक्षक जालिंदर राऊत यांचे ते वडील तर गोरक्षनाथ माध्यमिक विद्यालय खोकर येथील शिक्षिका सौ. संगीता राऊत यांचे ते सासरे होत.

### ७९ व्या स्वातंत्र्यानिमित्त जिओहॉटस्टारतर्फे ऑपरेशन तिरंगा

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : भारताचा ७९वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्याच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीचा उत्सव अधिक रंगतदार करण्यासाठी जिओहॉटस्टारने 'ऑपरेशन तिरंगा : तिरंगा एक कहानियां अनेक' हा विशेष उपक्रम जाहीर केला आहे. या अंतर्गत १५ ऑगस्ट रोजी संपूर्ण दिवसभर प्रेक्षकांना सर्व कंटेंट विनामूल्य उपलब्ध होणार आहे.या संकलनात देशाच्या तिरंग्यातील प्रत्येक रंगाशी निगडित भावना, ओळख आणि आदर्शांना साजेसा दमदार चित्रपट व शो यांचा समावेश आहे.

भगव्याशी संबंधित शौर्य 'टेक ऑफ', 'मद्रास कॅफे' आणि 'आयबी७१' मध्ये; पांढऱ्याशी निगडित त्याग व चिकाटी 'सलाकार', 'नीरजा', 'मंगल पांडे : द राइझिंग' आणि 'चंद्रशेखर'मध्ये; तर हिरव्याशी संबंधित स्वाभिमान व संस्कृती 'सरजमीन', 'केसरी २' आणि 'एअरलिफ्ट' सारख्या चित्रपटांतून अनुभवता येईल. हे सर्व चित्रपट राष्ट्राला एक सुसंगत व प्रेरणादायी सलामी देणार आहेत.१५ ऑगस्टला प्लॅटफॉर्मचा इंटरफेस देशभक्तीच्या रंगात सजणार असून, प्रेक्षकांचे स्वागत विशेष स्प्लॅश स्क्रीनद्वारे होईल.

### तृतीयपंथी समाजाचे अध्यक्ष काजल गुरु यांचे निधन

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : तृतीयपंथी समाजाचे जिल्हा अध्यक्ष समाजकारणात सक्रीय असणारे काजल गुरु बाबू नायक नगरवाले यांचे आज अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. गेल्या दहा दिवसांपासून ते साईदीप हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल होते. मात्र, प्रकृतीत सुधारणा न झाल्याने आज त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी कळताच तृतीयपंथी समाजासह विविध सामाजिक क्षेत्रातून शोक व्यक्त केला जात आहे.

### एचडीएफसी अर्गोचा 'सुरक्षा संकल्प' आता 'मिसिंग मिडल'साठी

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : देशातील कोणत्याही सरकारी आरोग्य योजनेखाली नसलेल्या आणि खासगी विमा नसलेल्या सुमारे ४० कोटी नागरिकांसाठी एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीने 'सुरक्षा संकल्प' योजना जाहीर केली असून, फोन पेच्या सहकार्याने ती डिजिटल पद्धतीने सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार केला आहे. 'मिसिंग मिडल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गटात प्रामुख्याने निम्न आणि मध्यम उत्पन्न गटातील तसेच असंघटित क्षेत्रात काम करणारे लोक आहेत, ज्यांना आरोग्य खर्चाचा मोठा भार स्वत: उचलावा लागतो. या योजनेंतर्गत कॅशलेस हॉस्पिटलायझेशन, ओपीडी कन्सल्टेशन, वैयक्तिक अपघात कव्हर, व्हेक्टर बॉर्न डिसीज उपचार, लिस्टेड कन्झ्युमेबल्सचा समावेश अशा सर्वसमावेशक सुविधा केवळ १२ रुपये प्रतिदिवस प्रिमियममध्ये उपलब्ध होणार आहेत. योजनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ३ लाख रुपयांपर्यंत इन-पेशंट हॉस्पिटलायझेशन कव्हर, हॉस्पिटलायझेशनसाठी १५ दिवस प्रतिदिन २००० भत्ता, तसेच व्हेक्टर बॉर्न डिसीजसाठी १० दिवस प्रतिदिन १५०० भत्ता. याशिवाय अमर्यादित जनरल फिजिशियन टेलीकन्सल्टेशन आणि २००० पर्यंत इन-पर्सन कन्सल्टेशनची सुविधा देण्यात आली आहे.

### एचसीएल टेक ने एचसीएल समूहाची ४९ वी वर्षगाठ; साजरी करण्यासाठी भारतभरात ४९,००० रोपे लावली

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : जागतिक तंत्रज्ञान कंपनी एचसीएल टेकच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या उपक्रमांना पुढे नेणाऱ्या एचसीएल फाउंडेशन ने आज एचसीएल समूहाचा ४९ वा वर्धापन दिन मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण मोहिमेद्वारे साजरा केला, ज्यांत संपूर्ण भारतभर ४९,००० रोपे लावण्यात आली. हा उपक्रम नोएडा, नागपूर, पुणे, बेंगळुरू आणि लखनौसह प्रमुख शहरांमध्ये राबविण्यात आला.

या उपक्रमात एचसीएल टेकचे कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय, ना-नफा भागीदार, महिला समूह आणि समुदाय सदस्य यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या एकत्रित प्रयत्नाने सामायिक जबाबदारी आणि सर्वसमावेशक कृतीची भावना प्रतिबिंबित केली, तसेच एचसीएल टेकच्या शाश्वतता आणि पर्यावरणीय जबाबदारी बाबतच्या खोलवर रुजलेल्या बांधिलकीला अधिक बळकट केले.

# शेवगाव शहरातील मुख्य रस्त्यांना असलेल्या खड्ड्यांबाबत तहसीलदार यांना निवेदन !

## २५ तारखेला रोडवर वृक्षारोपण करण्याचा इशारा !

■ जनप्रवास प्रतिनिधी

शेवगाव : शेवगाव शहरातून अहिल्यानगर रोड श्रीरामपूर रोड मिरी मार्गे नगर रोड गेवराई रोड या सर्वच महामार्गांची आहे. दूर अवस्था झालेली आहे. या रस्त्यांची तत्काळ दुरुस्ती करावी या मागणीसाठी भाजप प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे व शेवगाव पंचायत समितीचे मा उपसभापती अरुण पाटील लांडे यांच्या नेतृत्वाखाली आज बुधवार दि १३ रोजी शेवगावचे नायब तहसीलदार राजेंद्र बकरे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव शहरातून जे मुख्य महामार्ग जात आहेत, त्या सर्व मुख्य महामार्गांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. प्रत्येक रस्त्यावर मोठाले खड्डे पडले असल्याकारणाने हे रस्ते मृत्यूचे सापळे बनले आहेत, या रस्त्यावर अपघात होत असल्याकारणाने नागरिक जखमी होत आहेत, या रस्त्यांना मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्याकारणाने दुचाकी, शाळकरी मुले, वयस्कर व्यक्ती यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते, त्यामुळे या रस्त्यावर कायमच अपघात होत आहेत. या रस्त्यांची तत्काळ दुरुस्ती करावी अन्यथा येथे २५ ऑगस्ट रोजी कोणताही इशारा न देता रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असे मुंढे यांनी यावेळी सांगितले. तसेच यावेळी लोकप्रतिनिधी वर टीका करताना मुंढे हे म्हणाले की, लोकप्रतिनिधींनी आपल्या नात्यागोत्यातील लोकांना रोडची कामे दिल्याकारणाने तिसगाव पैठण ह्या रोडचे काम अतिशय संत गतीने चालू आहे. परंतु ह्या रोडवर पडलेल्या खड्ड्यामुळे पैठणला नात महाराजांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या रोडवर पडलेल्या खड्ड्याची तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

यावेळी शेवगाव पंचायत समितीचे मा उपसभापती अरुण पाटील लांडे, शिवस्मारक समितीचे अध्यक्ष डॉ नीरज लांडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फंदे, अॅड श्याम कणगरे, माजी नगरसेवक शब्बीर शेख, युवा मोर्चाचे माजी उपाध्यक्ष नितीन फुंदे, दिगंबर काथवटे, अंकुश ढाकणे, परम जवरे, सिद्धांत बडधे, अभय पालवे, कडू मगर, अनिल इंगळे इत्यादींच्या या निवेदनावर सही आहेत.

**रस्ते व अपघाताबाबतची जबाबदारी निश्चित करा !**

शिवस्मारक समितीचे अध्यक्ष डॉ नीरज लांडे यांनी यावेळी म्हटले की रस्त्यावरील अपघाताबाबत जबाबदारी निश्चित करून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत दोषी धरा व त्यांच्यावर कारवाई करा! अशी मागणी त्यांनी यावेळी शेवगाव तहसीलदार यांच्याकडे केली.



## मनात व्यर्थ आणि नकारात्मक विचारांची गती अधिक असते : ब्रह्माकुमारी मंजू दिदी

### प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय येथे रक्षाबंधन संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी



पारनेर : मनात व्यर्थ आणि नकारात्मक विचारांची गती अधिक प्रमाणात असते. आणि हि गती जंगला प्रमाणे असते ती सतत वाढतच जाते तर सकारात्मक विचारांची गती हळूच संख्याने कमी तर काही वेळा पुरतीच असते. हि सकारात्मक विचाराची गती अंगणातील बागे सारखी असते तिला विकसित करावे लागते. ज्या प्रमाणे मनात विचार असतात त्या प्रमाणे ते आपल्या चेहऱ्यावर दिसून येतात. त्या प्रमाणे आपल्या कपाळावर चिंता दिसते. एक विचार अनेक विचारना जन्म देत असतात. ज्या प्रमाणे शरीराचे आजाराचे निदान करायचे असेल तर नाडीची गती तपासली जाते त्या प्रमाणे मनाचा आजार हा विचारांच्या गतीने माहित पडतो ज्या प्रमाणे शरीराचे आजार बरे करायचे असेल तर सलाईन, औषध देऊन बरे केले जातात त्या प्रमाणे मनाचे आजार हे सत्संगांचे सार, चांगले विचार, सतत मनन चिंतन केल्याने मनाचे आजार कमी होत असतात असे प्रतिपादन राजयोगिनी मंजू दिदी यांनी केले त्या पारनेर येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय आयोजित रक्षाबंधन कार्यक्रम मध्ये बोलत होत्या. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजयोगिनी राजेश्वरी दिदी,प्रभा दिदी, ज्ञानेश्वरी दिदी, पारनेर केंद्राच्या ब्रह्माकुमारी साधना दिदी, लताबाई खोडदे, देवराम ढोले, अॅड. शिवाजी जाधव, जबाजी खोडदे, हिराबाई मगर, देवराम खोडदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## काष्टीतील व्यापाऱ्याला आमिष दाखवून ५० लाखांची फसवणूक

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील एका गरिब कुटुंबातील व्यापार्याने आपले पै-पै साचविलेले पैसे पुणे (भोसरी) येथील गावगुंडांनी त्यांना दुप्पट पैशाचे अमिश दाखवून सुमारे ५० लाख रुपयाची फसवणूक केल्याने सदर व्यापाऱ्यावर आत्महत्येची वेळ आली आहे.

सविस्तर माहिती अशी कि तालुक्यातील काष्टी येथील एका गरिब कुटुंबातील व्यापार्याने आपल्या व्यवसाय करुण गाडी धंदा करुण पैसे साठवले असताना त्यांना एका दलाला मार्फत कमी दिवसात दुप्पट पैसे कमवून देतो असे अमिश दाखवून त्यांच्याकडे पैसे भरायला लावले.सदर व्यापार्याने सुरुवातीला दोन लाख रुपयेची गुंतवणूक केली. त्यातून त्याला कमी दिवसात दोनाचे चार लाख मिळाले. यातून भोसरीच्या त्या गुंडांनी व्यापार्याचा विश्वास संपादन केला. दुप्पट पैसे मिळण्याची खात्री झाल्यानंतर सदर व्यापार्याने आपल्या जवळचे पंचवीस लाख व मित्रा कडून पंचवीस लाख असे ५० लाख रुपये रोख भोसरी मधील दलाला मार्फत गुजरात येथे जमा केले. तेथेच त्यांना पुण्यामध्ये दुप्पट पैसे देण्याचे आश्वासन दिले. सुरुवातीला गोड गोड बोलून लवकरच पैसे मिळतील असे सांगितले. नंतर त्यांची नियत बदलली आणि तुम्ही कोणाला पैसे दिले,तुमच्या कडे पैसे दिल्याचा काय पुरावा आहे. असे उलट उत्तरे विचारुण पैसे देण्यास टाळाटाळ सुरु केली. त्यानंतर सदर गुंडांनी चेक दिला त्याचीही मुदत संपली यातच यातच व्यापारी ची फसवणूक झाली. पण आज गुंतवणूक केलेल्या व्यापार्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले झाले आहे. पण तुझे पैसे आम्ही मिळवून देतो म्हणणारे आता हात झटकू लागले आहेत.

यामध्ये मोठी आर्थिक तडजोड झाल्याची चर्चा दबक्या आवाजात ऐकायला मिळते. कि तो फितूर झालेला कार्यकर्ता कोण यासाठी लवकरच तो व्यापारी भोसरी येथील गावगुंडाच्या विरोधात पोलिस महानिरिक्षक यांची भेट घेऊन आपली कैफियत मांडणार आहे. तेव्हाच सर्व सत्य बाहेर येईल हे मात्र नक्की!

## संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयात "सक्षम तु" कार्यशाळेस उस्फूर्त प्रतिसाद

### मुलींसोबतच पालकांनीही सतर्क राहणे आवश्यक आहे : कल्पना चव्हाण

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : महिलांवरील व बालकांवरील वाढते अत्याचाराला आळा बसविण्यासाठी पोक्सो हा कायदा तयार झाला आहे. शाळेतील मुलांनी व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम चा वापर करू नये.तसेच मोबाईलचा अती वापर टाळावा.मुलींनी शाळेत येताना, बसने प्रवास करीत असताना जर कोणी वाईट नजरेने पाहुन छेडछाड केली.अथवा पाठलाग केला तर या गोष्टी मुलींनी आई किंवा शिक्षकांशी बोलणे आवश्यक आहे.तसेच मुलींनी कोणी स्पर्श करत असेल तर ते ओळखणे महत्त्वाचे आहे. याविषयी पालकांनी मुलांची संवाद करणे व या विषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. सर्वांना पोलिसांचे हेल्पलाइन नंबर माहिती असणे तितकेच आवश्यक आहे. नागरिकांनी काही अडचणी आल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. पोलीस हेल्पलाइन क्रमांक -११२, महिला हेल्पलाईन नंबर १०९१,चाईल्ड हेल्प लाईन क्रमांक १०९८,तसेच सायबर सेलचा क्रमांक १९३० असा आहे. मुली सुरक्षित राहण्यासाठी पालकांनीही सतर्क राहणे आवश्यक आहे.असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण यांनी केले आहे.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेश सचिव लतिकाताई पवार,शालेय शिक्षण समितीच्या व्हाईसचेअरमन श्रीमती.मृणालताई कनोरे, सामाजिक कार्यकर्त्या छायाताई राजपूत,नलिनीताई कनोरे,सौ. वैशालीताई नळकांडे, मुख्याध्यापिका कल्पना भामरे ( जाधव ),राजेंद्र गर्जे,श्रीमती चंदा कार्ले,आदींचा माता पालक आणि विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सारडा महाविद्यालयात "संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांचे जीवन" कार्यावर व्याख्यान

■ जनप्रवास प्रतिनिधी




अहिल्यानगर : महाराष्ट्र हे संतांची भूमी आहे या . संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांनी संत ज्ञानेश्वरी हा पवित्र ग्रंथ नेवासा या नगरीमध्ये लिहिला आहे.हे आपले अहिल्यानगर वासियांचे अहो भाग्यमच आहे.भागवत धर्माचा आचरण अंगीकार करून कोणीही ईश्वर प्राप्त करून घेऊ शकतो. हे बीज माऊलींनी जनसामान्यांमध्ये रोवले. ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस असे म्हटले जाते.

ज्ञानेश्वरी ग्रंथाचे मुख्य प्रेरणा स्त्रोत हे त्यांचे बंधू विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ यांना मानले जाते. श्री भगवत गीतेचे ७०० श्लोक व १८ अध्याय आहेत या ७०० श्लोकावर संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांनी ९००० ओव्या लिहिल्या व प्रत्येक ओवी विश्लेषित केले. ज्ञानेश्वर माऊली यांनी ज्ञानेश्वरी मध्ये कर्मयोग भक्तीयोग व ज्ञान योगाचे महत्त्व विशद केले आहे. . ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञान आणि भक्तीचे प्रतीक बनले आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथामुळे भारतीय संस्कृती आणि संतवाडमायाकडे अखिल विश्वाचे लक्ष वेधले गेले. संत ज्ञानेश्वर माऊली यांनी वयाच्या २१व्या वर्षी इसवी सन १२९६ मध्ये इंद्रायणी काठी देवाची आळंदी येथे संजीवन समाधी घेतली. जगाला विश्वशांतीचा संदेश देणारे पसायदान संत ज्ञानेश्वरांनी सांगितले.असे प्रतिपादन लेखक व प्रेरणादायी वक्ते दत्तात्रय वारकड यांनी केले आहे.

## या आयुर्वेदिक सुपरफूड्ससह पावसाळ्यातील मुरुमांना निरोप द्या

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : हवामान बदलताना आर्द्रता आणि तापमानात फरक येतो, ज्यामुळे त्वचेच्या समस्या जसे की बंद छिद्रे, जास्त तेलकटपणा आणि सतत फोड येणे होऊ शकतात. आपण सहसा त्वचारोगनाशक उत्पादने वापरण्यावर लक्ष केंद्रित करतो, पण आहाराचा परिणाम विसरतो.

आयुर्वेदानुसार, ऋतू बदलांमुळे दोष, विशेषत: वात आणि पित्त दोष मोसमी पावसाळ्यात अधिक वाढतात, ज्यामुळे त्वचेमध्ये जळजळ आणि फोड-फुगीसारख्या समस्या निर्माण होतात. गरम पेये आणि तळलेले अन्न यांची आस असताना, योग्य त्वचारोगनाशक उपचारांसह आहारातून अंतर्गत समतोल राखल्यास या ऋतूमध्ये त्वचेचा आरोग्य मोठ्या प्रमाणात सुधारू शकतो.

प्रख्यात आयुर्वेद तज्ञ डॉ. मधुमिता कृष्णन यांचा सल्ला आहे की, पावसाळी आहारात वात आणि पित्त दोष संतुलित करणाऱ्या, नैसर्गिकरीत्या गोडसर आणि किंचित तैलयुक्त अन्नपदार्थांचा समावेश करावा, ज्यामुळे शरीराला शांती मिळते आणि त्वचेच्या समस्यांचे व्यवस्थापन होते.

## घोगरगाव शाळेत अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी




टाकळीभान : त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या घोगरगाव येथील त्रिमूर्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य एस .आर जावळे, एन. के साळवे, प्रमुख वक्ते हरिश्चंद्र डिके, अनुलोम संस्थेच्या निशिगंधा आदिक, घोगरगाव चे सरपंच आप्पासाहेब शिंदे माजी सरपंच सदाशिव बहिरट, ज्ञानदेव टेकाळे, राजेंद्र साप्ते, माधव बहिरट, प्रशांत बहिरट, संभाजी बहिरट आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख वक्ते हरिश्चंद्र डिके म्हणाले की, अहिल्याबाई होळकर यांची पुण्यतिथी हा दिवस केवळ त्यांच्या स्मृतीचा नाही तर त्यांच्या विचारांचा, कार्यांचा आणि प्रेरणादायी जीवनाचा स्मरण करण्याचा आहे. १७ व्या शतकातील तपस्वी अहिल्यादेवी होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या .

त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदी घाट बांधले एवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून प्रसिद्ध हिंदू मंदिराचा जिर्णोद्धार केला. यावेळी अर्चना जगताप, संदीप काळे, मनेष वेताळ, रेखा दिवे, विकास कौटे, अमोल बहिरट, ललिता गारुळे, कृष्ण शिंदे, वनिता नाणेकर, प्रियंका कोरडे, मयुरी राऊत, अश्विनी खुरुद, संकेत सावंत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संभाजी गारुळे यांनी व्यक्त केले

# रवंदेत अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ



■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : हिंदू संस्कृती ही अत्यंत प्राचीन, समृद्ध आणि जीवनमूल्यांवर आधारित आहे. 'सत्यम् शिवम् सुंदरम्' या तत्त्वज्ञानावर उभारलेली ही संस्कृती कर्म, भक्ती, ज्ञान आणि योग या चारही मार्गांचा समावेश करते. त्यात भक्तिमार्गाला जे स्थान आहे, ते अद्वितीय आहे. महाराष्ट्राची भूमी ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ आदी संतांनी या भक्तीमार्गाचे बीज समाजात पेरले आणि हरिनाम सप्ताहासारख्या उपक्रमांमधून हे बीज आजही जिवंत असून दरवर्षी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते त्याप्रमाणे याहीवर्षी कोपरगाव तालुक्यातील रवंदे येथे ग्रामदैवत श्री शंभो महादेवाच्या कृपा आशीर्वादाने बुधवार (दि.१३) ते बुधवार(दि.२०) या काळात श्री शंभो महादेव मंदिर या ठिकाणी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रवंदे ग्रामस्थ सप्ताह कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे.

श्रावण महिना हा हिंदू धर्मपरंपरेत अत्यंत पुण्यदायी आणि पवित्र मानला जातो. भगवान शंकराचा प्रिय महिना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मासात उपासना, व्रते, अन्नदान, जप-तप आणि नामस्मरण यांना विशेष महत्व आहे. या महिन्यात ईश्वरभक्तीच्या माध्यमातून आत्मशुद्धी आणि साधनेचा मार्ग अधिक स्पष्ट होतो, असे शास्त्र आणि पुराणात सांगितले आहे.

म्हणूनच या काळात अखंड हरिनाम सप्ताहासारख्या धार्मिक उपक्रमांचे आयोजन करणे हे आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत फलदायी मानले जाते.म्हणूनच दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी रवंदे येथे अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून सप्ताहाचे हे २१ वर्ष आहे.

सप्ताह काळात संपूर्ण आठवडाभर, हरिपाठ, भजन, अभंग गायन, आणि धार्मिक कथांच्या माध्यमातून ईश्वरभक्तीचा सागर उचंबळून वाहणार आहे. नामस्मरणाच्या या अनुष्ठानात सर्व वयोगटातील ग्रामस्थांनी सहभागी व्हावे. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी ह.भ.प.शांताराम महाराज गाडेकर (सोमठाणा) यांचे काल्याचे कीर्तन होवून महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी नव्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करु : मुख्य कार्यकरी आनंद भंडारी

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : ग्रामसेवकांनी लोकसहभागातून ग्रामविकासाची चळवळ जनसंपर्क वाढविणे आणि घरपट्टी व पाणी वसुलीचा रेषो वाढविण्यासाठी सतर्क व्हावे थकीत घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीची सुरुवात ग्रामपंचायत सरपंच सदस्यापासून करावी थकीत सदस्यांच्या विरोधात कारवाई करावी अशी अशा सुचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिल्या आहेत

बुधवारी श्रीगोंदा पंचायत समिती सभागृहात ग्रामसेवक व पंचायत समिती विभाग प्रमुखाची बैठक घेतली त्यानंतर आनंद भंडारी यांनी पत्रकारांशी संवाद साधला

भंडारी पुढे म्हणाले की जलजीवन मिशन अंतर्गत असलेल्या नळपाणी पुरवठा योजनेची कामा संदर्भात आढावा घेतला यामध्ये ज्या ठेकेदारांना एकुण बिलाच्या ६० टक्के पेक्षा अधिक पैसे दिले आहेत अशा ठेकेदारांनी अपुर्ण कामे पूर्ण करावीत अन्यथा कारवाई करण्यात येणार आहे



**..तर ग्रामसेवकांवर कारवाई**

सोमवारी दुपारी ग्रामसेवकांनी श्रीगोंदा शहरातील एका मंदीरात बैठक घेतली ही बैठक का घेतली कार्यालयीन वेळेत हे ग्रामसेवक एकत्रच गेले आहे ही गंभीर बाब आहे याची माहिती घेणार आहे नंतर संबंधीत ग्रामसेवकांकडून खुलासा मागविण्यात येणार आहे यासंदर्भात गटविकास अधिकारी राणी फराटे यांना सुचना दिल्या आहेत. असेही आनंद भंडारी म्हणाले

श्रीगोंदा तालुक्यातील ज्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारतीचे निरलेखन झाले आहे अशा इमारती पाडण्यासाठी परवानगी देण्यात येईल शाळा खोल्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल घरकुल योजना व नरेगाच्या कामांची गती वाढविण्यासाठी सकारात्मकता महत्वाची आहे. या बाबत अधिकाऱ्यांनी दक्षता घेण्याची गरज आहे. उमेद अंतर्गत श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी जिल्हा गटातील महिला बचत गटांचे सुमारे ८० लाखाचा गैरव्यवहार झाला ३६ लाख वसुल करण्यात आले आहेत राहिलेले पैसे भरण्यासाठी ९२ जणांवर जबाबदार निश्चित करण्यात आली आहे त्यांना नोटीसा बजावण्यात आल्या पंधरा दिवसात पैसे न भरल्यास गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

# ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना श्रीगोंद्यात पोलीस कॉन्स्टेबल जाळ्यात

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : श्रीगोंदा तालुक्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (अउइ) पथकाने १२ ऑगस्ट रोजी यशस्वी सापळा रचत कारवाई करून एका पोलीस कॉन्स्टेबलला लाच स्वीकारताना आरोपीचे संभाजी शिवाजी घोडे (वय ३२, व्यवसाय – नोकरी, पोलीस कॉन्स्टेबल, रा. श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर) यास रंगेहात पकडले. असून, त्याच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३२ वर्षीय महिला तक्रारदार आपल्या कुटुंबासह श्रीगोंद्यात राहत आहे. त्यांच्या मुलाविरुद्ध स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी अर्ज दाखल झाला होता. त्यानंतर आरोपी कॉन्स्टेबल घोडे यांनी तक्रारदारांच्या मुलाला पोलिस स्टेशनमध्ये बोलावले व प्रकरण मिटवण्यासाठी मध्यस्थी केल्याचा दावा केला. तसेच, तुमच्या मुलावर गुन्हा दाखल होऊ दिला नाही, मोबाईल परत हवा असेल तर २०,००० रुपये द्या'' अशी लाचेची मागणी केली. शेवटी तोडजोडी अंती ३,००० रुपयांची मागणी करण्यात आली.

तक्रारदारांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अउइ, अहिल्यानगर येथे तक्रार नोंदवली. त्यानुसार ११ व १२ ऑगस्ट रोजी पडताळणी करण्यात आली. पडताळणीत आरोपीने पंचांच्या उपस्थितीत ३,००० रुपयांची मागणी व स्वीकार करण्याची तयारी दर्शवली. १२ ऑगस्ट रोजी सापळा रचून आरोपी घोडे यांनी तक्रारदारांकडून स्वतः ३,००० रुपयांची लाच स्वीकारताच त्यांना जागीच अटक करण्यात आली. लाच रक्कम व हॅश व्हॅल्यू जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पथकात पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल रवी निमसे, बाबासाहेब कराड, वैभव सुपेकर, चालक पोलीस हवालदार हारून शेख, लाड (सर्व अउइ अहिल्यानगर) यांचा समावेश होता.

मार्गदर्शक म्हणून भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र आणि माधव रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र यांनी मार्गदर्शन केले.

# नेप्ती येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्याला महिलेकडून अमानुषपणे मारहाण

## नगर तालुका पोलीस स्टेशनमध्ये तक्रार

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : नेप्ती येथील जिल्हा परिषद शाळेतील तिसरीचा विद्यार्थी स्वराज शिंदे याला वर्गामध्ये जावुन तनिष्का सागर गव्हाणे हिच्या आईने पैसे चोरतो. असे म्हणून चार-पाच वेळा थोबाडीत मारले,पाठीत मारले व पोटात लाथ मारुन खाली पाडून पायाखाली तुडवले आहे.

या घटनेची माहिती पालक सागर मारुती शिंदे व काका नितीन शिंदे यांना समजल्यानंतर शाळेत गेले असता स्वराज एकटाच कोप-यात बसून रडतांना दिसला,त्याचे तोंडावर व पाठीवर चापटीने मारलेले व्रण दिसत होते.व त्याच्या डोक्याला टेंगुळ आलेले होते.या घटनेबाबत पालक सागर मारुती शिंदे यांनी इयता वर्गशिक्षीका पाटोळे मॅडम यांना विचारले असता.त्यांनी सांगितले की, तनिष्का सागर गव्हाणे हिची आईने वीस रुपये शाळेच्या पटांगणामध्ये हरवले आहेत. व तिला वाटले की तुमच्या स्वराजने त्यांचे पैसे चोरले म्हणून त्यांनी त्याला मारहाण केली आहे. त्याबाबत वर्गशिक्षीका पाटोळे मॅडम यांना विचारपूस केली की, तुम्ही वर्गात असतांना मुलाला मारहाण का करू दिली.तेव्हा त्यांनी सांगितले की,ते मला काही माहिती नाही,तुमचे काही म्हणणे असल्यास तुम्ही मुख्याध्यापिका मांडगे मॅडम यांच्याशी बोला,या प्रकरणाशी माझा काही संबंध नाही.असे बोलून त्यांनी मला व माझा मुलगा स्वराज याला वर्गाच्या बाहेर जाण्यास सांगितले.

मुख्याध्यापिका मांडगे मॅडम यांना गव्हाणेबाई विरुद्ध असे सांगितले असता त्यांनी तक्रार घेण्यास नकार दिला व सांगितले की, तुम्हाला आमच्या कडे तक्रार करता येणार नाही, आमची कमिटी असते, ती कमिटी बसल्यावरच तक्रार करता येते.तुम्हाला तक्रार करता येणार नाही, तुम्ही जास्त बोलू नका व ज्ञान देऊ नका, तुमच्या दोन्ही मुलांना घेऊन जा.आम्हाला काही गरज नाही तुमच्या मुलांची,असे म्हणून शाळेतुन हाकलून दिलेले आहे, हा सर्व प्रकार तेथे हजर असलेले शिक्षक कार्ले सर यांच्या समोर झाला.तरी सर काहीही बोलले नाही उलट त्यानी गेटच्या बाहेर जाण्यास सांगितले व म्हणाले की,तुम्ही एकाच गावातले लोक आहेत.काय असेल ते शाळेच्या गेटच्या बाहेर तुम्ही तुमच निपटा व इथून निघून जा असे म्हणाले.

मारहाण झाली त्यानंतर स्वराज हा अतिशय घाबरलेला असल्यामुळे त्याला बोलताही येत नव्हते.त्याने सांगितले की, मला पोटात व डोक्यात खूप दुखत आहे म्हणून त्याला सिव्हिल हॉस्पीटल, अहिल्यानगर येथे दवाखान्यात घेवून गेली व तेथे डॉक्टरांनी त्याचा औषधोपचार चालू केलेला आहे.

तरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेप्तीमधील मुख्याध्यापक श्रीमती मांडगे मॅडम, इयता तिसरीच्या च्या वर्गशिक्षीका पाटोळे मॅडम, कार्ले सर व तनिष्का सागर गव्हाणे हीचे आईचे नाव माहिती नाही.

त्यांच्या विरोधात मुलगा स्वराज याला मारहाण केलेबाबत तक्रार दाखल करून घ्यावी.व शाळेचे कर्मचारी विरुद्ध योग्य कार्यवाही करावी.न्याय मिळावा.अशी तक्रार नगर तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# स्वच्छ भारत अभियानांतर्गत लालाशेठ बिहाणी विद्यामंदिरात डस्टबिन वाटप

## डॉ. माने मेडिकल फाउंडेशन व रिसर्चचा उपक्रम

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : स्वच्छतेचे महत्त्व आणि आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यासाठी राहुरी येथील कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशालेत स्वच्छ भारत अभियानांतर्गत डस्टबिन वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. हा कार्यक्रम साई धम हॉस्पिटल राहुरी, डॉ. माने मेडिकल फाउंडेशन व रिसर्च सेंटर राहुरी आणि एसबीआय संजीवनी यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

कार्यक्रमात प्रमुख वक्ते डॉ. स्वप्नील माने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारत सरकारच्या स्वच्छता अभियानाबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी घरातील सदस्य व्यसनाधीन असल्यास विद्यार्थ्यांनी त्यांना व्यसन सोडण्यासाठी प्रवृत्त करावे, जेणेकरून आरोग्यदायी नागरिक तयार होतील, असे सांगितले. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये चष्म्याचे प्रमाण वाढत असल्याचे नमूद करून, मोठ्यांनीही मोबाईलचा वापर मर्यादित करावा, असा सल्ला त्यांनी दिला.

डॉ. माने यांनी विद्यार्थ्यांनी जीवनशैलीत सकस आहाराचा समावेश करणे, वेळेवर जेवण करणे, घरगुती व्यायाम व योगासने करण्याची सवय लावणे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, रात्री उशिरापर्यंत जागून अभ्यास करण्याऐवजी पुरेशी झोप घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात कैलासवासी लालाशेठ बिहाणी यांच्या शिक्षण क्षेत्रातील मोठ्या योगदानाची आठवण करण्यात आली. त्यांच्या कार्यामुळे आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमांमुळे या शाळेने तालुक्यात प्रतिष्ठा मिळवली आहे, असे सांगण्यात आले. यावेळी



डॉ. वैशाली बल्लाळ, डॉ. सूरज विटनोर, डॉ. आकाश चौरे, डॉ. मानसी धर्मसाळे तसेच साई धम हॉस्पिटलचा सर्व स्टाफ उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन धनंजय गिरी यांनी केले.या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक राहुल जगताप, जेष्ठ शिक्षक भाऊसाहेब मोरे, सर्व शिक्षकवृंद, इतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत तसेच आरोग्यपूर्ण जीवनशैलीबाबत सकारात्मक संदेश पोहोचला.

# न्यू इंग्लीश स्कुलमध्ये अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालया मध्ये

प्रजाहितदक्ष राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले .यावेळी व्यासपीठावर विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एम शिंदे, पर्यवेक्षक एस.एस जरे, संविधान ग्रुपचे विनोद रणनवरे, कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे उपशिक्षक व्ही .एस माळी आदी मान्यवर उपस्थित होते .



कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयामध्ये हर घर तिरंगा अभियानांतर्गत संविधान विनोद रणनवरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सुंदर रणनवरे, पंकज अमोलिक, प्रतिक रणनवरे, शंकर रणनवरे, किशोर पंडित, सुरज शिदे, शामराव खरात, पंकज जाधव आदी उपस्थित होते .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ए .ए .पाचपिंड, सूत्रसंचालन कु . अलिशा भैलिमकर यांनी तर आभार युवराज थोरात यांनी व्यक्त केले.

# राज्यस्तरीय विश्वकर्मा उद्योग भूषण पुरस्कार सौ. वृषाली चव्हाण यांना प्रदान

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : राज्य गुणवंत कामगार व जागृत नागरिक सेवा संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय विश्वकर्मा उद्योग भूषण पुरस्कार सौ वृषाली चव्हाण यांना प्रदान करण्यात आला. र

ाजश्री शाहू महाराज जयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य व सामाजिक कार्यात कार्यरत असल्याचा सन्मान या पुरस्काराव्दे करण्यात आला. माझी गृहमंत्री व विरोधी पक्षनेते आमदार सतीश पाटील यांच्या हस्ते, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आमदार जयंत तासगावकर, डॉक्टर




रविकांत पाटील, ब्रह्मकुमारी सुनंदा दीदी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

सौ वृषाली चव्हाण यांचे वृषाली मसाले असा उद्योग आहे. कलेची आवड असणाऱ्या वृषाली यांना आजपर्यंत शंभरहून अधिक बक्षीस व पुरस्कार मिळाले आहेत.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ५२.७१ लाखाचे अनुदान मंजूर : आ.आशुतोष काळे

■ जनप्रवास वार्ताहार

कोळपेवाडी : शासनाने दोन वर्षापूर्वी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान जाहीर केले होते, मात्र पात्र असूनही तांत्रिक अडचणीमुळे कोपरगाव तालुक्यातील अनेक शेतकरी या अनुदानापासून वंचित होते. त्याबाबत केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून महायुती शासनाकडून कोपरगाव तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ५२ लाख ७१ हजार ६४४ रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती, खासगी बाजार समिती व नाफेडला १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रती शेतकरी २०० क्विंटल पर्यंत ३५० रुपये प्रती क्विंटल याप्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. परंतु काही तांत्रिक अडचणी व कागदपत्रांची अपूर्तता यामुळे कांदा उत्पादक शेतकरी अनुदानासाठी पात्र असतांना



देखील त्यांना अनुदान मिळाले नव्हते.

हि बाब लक्षात घेवून आ.आशुतोष काळे यांनी मतदार संघातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळावे यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना समक्ष भेटून लेखी निवेदन देखील दिले होते. व आजतागायत त्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्यातून अखेर महायुती शासनाने कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा दिला असून पात्र असलेल्या परंतु तांत्रिक अडचणीमुळे अनुदान न मिळालेल्या एकूण २१० शेतकऱ्यांना ५२ लाख ७१ हजार ६४४ रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी आ. आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे. केलेल्या पाठपुराव्याची दखल घेवून ५२.७१ लाख रुपये अनुदान मंजूर केल्याबद्दल आ.आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे, कृषी मंत्री ना.दत्तामामा भरणे यांचे आभार मानले आहे.

# तरुणी ‘या’ गोष्टींनी तरुणांना आकर्षित करु शकतात

सॉफ्ट आणि लविंग नेचर असणे ही अनेक तरुणींची स्पेशालिटी असते. ज्या स्पेशालिटीमुळे तरुण तरुणींच्या प्रेमात पडतात. कधी तुमची गोड स्माईल तर कधी मधाळ डोळे तरुणाना प्रेमात पाडण्यासाठी पुरेसे असतात. परंतु दिर्घकाळ तरुणांना सुंदरतेच्या मोहात अडकवणे शक्य नसते. कारण त्यांना तुमचे सौंदर्य एका मर्यादेपर्यंतच आकर्षित करते. तरुणी अजुन कोणत्या गोष्टींनी तरुणांना अ‍ॅट्रॅक्ट करु शकता. हे जाणुन घेण्याची इच्छा आहे ना... चला तर मग वाचा या सवयी...

**अर्ध्या रात्री कॉल करणे** : दिवसभर तरुणींची बडबड, त्यांची शॉपिंग आणि इतर गोष्टींमध्ये तुम्ही मुले थकून जात असाल, परंतु रात्री २.३० ला जर अचानक फोन वाजला आणि फोन उचलल्यावर आय लव्ह यू, आय मिस यू हे मॅजिक वर्डस् ऐकायला मिळाले तर मन आनंदी होऊन जाते. अचानक मित्रांसोबत खेळताना, सिगारेट ओढताना किंवा लॅपटॉपवर काम करताना जेव्हा त्यांचा प्रेमपुर्ण आय लव्ह यूचा मॅसेज येतो तेव्हा चेहऱ्याचा रंगच बदलून जातो.

**तुमच्यासाठी जेवण तयार करणे** : ऑफिसमध्ये कामाचे टेंशन आणि घरी येताना बस, ऑटो, टॅक्सीमधील अडचण. या सर्वातुन फ्री होऊन जेव्हा तुम्ही घरी पोहोचता. तेव्हा डिनर टेबलवर टेस्टी जेवणासोबत सुंदर स्माईल देऊन पत्नी जेव्हा तुमची वाट पाहत असते. तेव्हा तुम्हाला होणारा आनंद तुम्ही व्यक्तच करु शकत नाही.

**अ‍ॅक्शन घेणे** : सोसायटीमध्ये होणारा एखादा अन्याय, महीलांच्या हक्कासाठी आवाज उठवणे आणि गरीब मुलांची मदत करण्याचा विचार या सवयी सर्व तरुणांना आवडतात. तसे तर तरुणी नैसर्गिकच इमोशनल असतात. परंतु आपल्या या इमोशनला त्या योग्य ठिकाणी एक्सप्रेस करतात तेव्हा सोसायटीमध्ये त्यांची एक वेगळीच छाप पडते.

**गोष्टी लक्षपुर्वक ऐकणे** : खुप कमी तरुणींमध्ये हा गुण असतो. परंतु जेव्हा तरुणी शांत होऊन, तुमचा हात हातात घेऊन, लक्षपुर्वक तुमची गोष्ट ऐकते तेव्हा तो एक अविस्मरणीय क्षण बनतो. तुमचे टॅलेंट, तुमचे इमोशन यांची काळजी करुन त्या तुम्हाला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देतात. ही मूव्हमेंट तरुणांसाठी खास असते. तरुणींच्या अशाच



सवयी रिलेशनशिप मजबूत करतात आणि आपसातील प्रेम वाढवतात.

**लक्ष ठेवणे** : ऑफिस मधील टेंशन, कुंटूबाची आठवण किंवा आई-वडीलांची काळजी करताना जेव्हा तुमची झोप उघडते, आणि तुम्ही आपली वाइफ किंवा गर्लफ्रेंड जवळ असता. तेव्हाचा अनुभवच वेगळा असतो. जेव्हा तरुणी, तुमचे डोके मांडीवर घेऊन आपल्या कोमल हातांनी डोक्याची मसाज करते. तेव्हा सगळा थकवा, काळजी चुटकीसरशी दूर होते. असे करणे असंभव असले तरी, असे केयरिंग नेचर तरुणांना आकर्षित करण्यासाठी एकदम परफेक्ट आहे. परंतु जास्त केयर करणे चांगले नाही.

**कन्फ्यूज नेचर** : जेव्हा तरुणी आपल्या केसांचा गुंता काढताना एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधतात. कपड्याचे सिलेक्शन हाताच्या इशाऱ्यानेच करतात, हा त्यांचा एक सवयीचाच भाग असतो. जो तरुणांना खुप पसंत असतो. भुवया चढवून, हाताचे बोट दातात दाबून आईनस्टीन बणण्याचा तरुणींचा प्रयत्न तरुणांना खुप आवडतो.

**अचानक मिठी मारणे**

तरुण जेव्हा खुप जास्त चिंतेत आहे आणि आपली गोष्ट स्पष्टपणे सांगू शकत नाही. अशात त्यांना इमोशनल सपोर्टची सर्वात जास्त गरज असते. अशात पत्नी किंवा गर्लफ्रेंडने मिठी मारणे खुप फायदेशीर ठरते. त्यांना आपल्या भावना शेयर करण्यासाठी कोणीतरी भेटते. फक्त तरुणींनाच नाही तर तरुणांना देखील अशी मूव्हमेंट्स खुप चांगले वाटते. जे रिलेशनशिपमध्ये प्रेम आणि आपुलकी वाढवतात.

**मदतीची अपेक्षा करणे** : अनेक तरुणी हेल्प करा असे म्हणत नाही. स्वतःच आपले काम करतात. परंतु हळु हळू पति किंवा बॉयफ्रेंडला तीने हेल्प करण्यासाठी सांगितले तर त्यांना चांगले वाटते. ते त्यांची मदत करु इच्छिता. या लहान गोष्टींवर लक्ष देऊन तुम्ही तुमच्या पती आणि बॉयफ्रेंडच्या मनात आपली जागा उच्च स्थानावर नेऊ शकता.

## नारळपाणी डायबेटीज नियंत्रण ठेवण्यात सहाय्य करते

नारळाला शुभ फळ म्हणून मानले जाते. नारळ खाण्यात स्वादिष्ट तर आहेच शिवाय औषधी गुणांनीही परिपूर्ण आहे. कच्चा नारळाचे पाणी स्वादिष्ट आणि रुचकर असते. याचा गरही स्वादिष्ट असतो.



नारळाचे पाणी खनिज आणि क्षार यांचे जणू भांडारच. यात कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि सोडियम ही तत्व असतात. यांच्या सेवनाने हाडे मजबूत होतात. याशिवाय यातील व्हिटॅमिन ‘सी’मुळे रोगप्रतिकार क्षमता वाढते आणि पचनतंत्र सुरळीत राहाते. बुजुर्ग लोकांसाठी तर हे एक टॉनिक आहे.

नारळपाणी प्यायल्याने ऊर्जा मिळते. उन्हाळ्याच्या दिवसांत नारळाचे पाणी आल्हाददायक आहे. यांच्या सेवनाने तहान तर भागतेच शिवाय थंडावाही मिळतो. उष्माघातापासून बचाव होतो. उन्हाळ्यातील मूत्रसंस्थेशीसंबंधीत विकारांवर नारळपाणी औषधी आहे डिहायड्रेशनमध्ये हे अमृतसमान आहे. नारळपाणी आरोग्य संजीवनी –

- शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी नारळाचे पाणी मददगार आहे. नारळपाणी पेशींपर्यंत ऑक्सिजन आणि पोषकत्व पोहोचविते.
- शरीराचे मेटॉबॉलिज्म वाढविते.

शरीरातील टाकावू पदार्थ शरीराबाहेर उत्सर्जित करते.


- डायबेटीज नियंत्रित ठेवण्यात साहाय्यक आहे.
- कॅन्सरचा धोका कमी करते.
- किडन्या निरोगी राहण्यास मदत करते. रक्ताभिसरणाची क्रिया व्यवस्थित ठेवते.
- लठ्ठ व्यक्तींसाठी फायदेशीर आहे. यात कार्बोडायड्रेटस कमी असल्याने वजन नियंत्रित राहते.

## कॉम्प्युटरवर काम करणं म्हणजे आतड्यांच्या कॅन्सरला निमंत्रण

दिवसभर कॉम्प्युटर बुडवणं हे धूम्रपानाइतकंच घातक आहे, असं पश्चि ऑस्ट्रेलियातल्या नामवंत विद्यापीठाच्या संशोधकांनी म्हटलं आहे. त्यांच्या म्हणण्याचं कारण स्पष्ट करताना हे संशोधक धोक्याचा लाल कंदील दाखवीत सांगतात की, दहा वर्षे कॉम्प्युटरवर काम करणं म्हणजे आतड्यांच्या कॅन्सरला निमंत्रण देणं.

कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर सतत नजर खिळवून ठेवणं भाग असतं, पण त्याचमुळे हृदयाचं आरोग्य धोक्यात येतं हा भलताच ‘सीरियस’ असा दिला दा मामला आहे. कार्डिऑलॉजिस्ट म्हणतात. रोज १२ तास कॉम्प्युटरवर काम करणाऱ्यांच्या बाबतीत हृदयविकारांची शक्यता ६७ टक्यांनी वाढते. तर लंडन युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी कमरेचा घेर वाढण्याबद्दल कॉम्प्युटरला जबाबदार धरलं आहे.

ब्रिटीश संशोधक म्हणतात, कॉम्प्युटरवरून जराही न उठता तासन्‌तास कॉम्प्युटरवर काम करणाऱ्यांच्या कमरेभोवती ‘टायर्स’ जमलेले दिसतात. जोडीला बॅड कोलेस्ट्रॉलचाही धोका असतो. मात्र हे टाळण्यासाठी काय करता येईल



हेही त्यांनी सांगितले आहे. कॉम्प्युटरवर काम करताना दर तासा–दीड तासानं एक मिनिट जरी उठतात, तरी हा धोका टळेल. कॉम्प्युटरवर सलग बसणं म्हणजे हालचाल थांबणं ती थांबली तर हार्ट डिसिझच काय, कॅन्सरचाही धोका आहे.

प्रत्येक तिसरी व्यक्ती कॉम्प्युटरवर १२ तासाहून अधिक काम करीत असते. ही व्यक्ती चहा–कॉफी अथवा लंचसाठीसुध्दा कॉम्प्युटरपासून दूर होत नाही. मानवी शरीराला इतका बैठेपणा झेपणार नाही. लठ्ठपणापासून कॅन्सरपर्यंत निरनिराळ्या रूपात त्याला होणारा त्रास जाहीर होतो.

प्रौढ किंवा मध्यमवयीन माणसांनी कॉम्प्युटरपासून अधूनमधून छोटा ‘ब्रेक’ घ्यावा, कारण या यंत्रणेमुळे त्यांना कितीतरी जास्त धोका आहे आणि तो म्हणजे विस्मरणाच्या आजाराचा ही माहीती देताना मायक्रोबॉयॉजिस्ट डॉ.जॉन चॅन्सलर पुस्ती जोडतात, मध्यमवयीन व्यक्तीनं आठवड्याला ४१ तासांहून अधिक काम करू नये, पण ५५ तास सलग काम करणारी माणसं सतत आढळतात.

त्यांना बऱ्याचदा स्मरणशक्ती हरवल्याचा भास होतो. कॉम्प्युटरवर एखाद्या टॉयलेटच्या सीटवर नसतील एवढे सूक्ष्म जंतू असतात. कॉम्प्युटरवरचं एकेक अक्षर म्हणजे जरवजंतूंचं आगर असतं.

त्यांचा परिणाम नाक आणि पोट यांच्या कार्यक्षमतेवर असतो, असं मायक्रोबॉयॉलॉजिस्ट डॉ.पीटर विल्सन यांनी माणसाला सावध करीत म्हटले आहे. कॉम्प्युटरचे दुष्पीरणाम टाळण्यासाठी...

0 दर एक तासानं ५ मिनिटांचा ब्रेक घ्या. या वेळात काहीतरी हालचाल करा. कँटीनपर्यंत चालत जा, जिना चढा–उतरा...काहीही!

0 ठरावीक अंतरानं पाणी प्या. तसंच दीर्घ श्वास घ्या.

0 लक्षात येईल तेव्हा कॉम्प्युटर स्क्रीनवरची नजर काढून घ्या आणि डोळ्यांची उघडझाप करा. डोळ्यांना पाणी लावा.

0 कॉम्प्युटरपासून उठणं शक्य नसेल तेव्हा खिडकीतून बाहेर नजर टाका. आकाश, बागेतली विविधरंगी फुलं अथवा भोवतालच्या निरनिराळ्या रंगांच्या वस्तू यांच्यावर क्षणभर नजर स्थिर करा.

0 डोळे मिटा आणि दोन मिनिटं संथ श्वासोच्छवास करा.

0 सतत चहा घेण्याऐवजी लिंबू सरबत अथवा कोरा चहा (ग्रीन टी) घ्या. त्यामुळे एनर्जी मिळेल.

0 बौध्दिक काम करताना मेंदूला उर्जा मिळण्यासाठी कार्बोहायड्रेटस् खाण्याची आवश्यकता असते. त्यासाठी डब्यामध्ये एखाददोन ताजी फळं ठेवा. फ्रेश सॅलड, अंकुरीत कडधान्य असतील तर आणखी चांगलं.

## गृहिणींनी केस मोकळे सोडून स्वयंपाक करू नये

घरात घडणाऱ्या दुर्घटना जास्तीत जास्त स्वयंपाकघरात घडत असतात. यामुळे काहीजण जीवाला मुकतात, तर काही अपंग बनतात. चौकेमें रहो चौकस अशी हिंदीत एक म्हण आहे. ती यथार्थ का वाटते, त्याची उदाहरणे पुढीलप्रमाणे –

१) गृहिणींनी केस मोकळे सोडून स्वयंपाक करू नये. भांड्यात वाकून पाहताना केसाची एखादी बट आगीच्या संपर्कात येऊ शकते व जेवणात केस पडतात.

२) जेवण शिजवताना ढिले कपडे कपडे वापरू नका. दुपट्टा गळ्यात घेऊ नका. दुपट्ट्याने गरम पातेले उतरू नका. साडीचा पदर कमरेला खोचा वा ॲप्रेन घालून स्वयंपाक करा. स्वयंपाक करताना सिंथेटिक कपडे वापरू नका.




३) लहान मूल धावत येऊन आईला अचानक मिठी मारते तेव्हा कार्यमग्न आईचा तोल जावून ती आगीवर पडण्याचा धोका असतो. लहान मुलांना स्वयंपाक घरात खेळू देऊ नका.

४) स्टोव्ह फरशीवर ठेवून स्वयंपाक करू नका. स्टोव्हला आपला किंवा मुलांचा धक्का लागू शकतो.

५) स्टोव्ह किंवा गॅस सुरू ठेवून दुसऱ्या खोलीत जाऊ नका. पदार्थ ऊतू जाऊन स्टोव्ह, गॅस विझण्याची शक्यता असते. त्यामुळे इंधन वाया जाते.

६) काडी पेटवून इकडे–तिकडे टाकू नका. लहान मुलांच्या हाती लागेल असा रॉकेलचा कॅन व काडेपोटी ठेवू नका.

७) स्टोव्हची टाकी अंतराळी असावी. तसेच स्टोव्हमध्ये जास्त हवा भरू नका. पेटता स्टोव्ह उचलून नेण्याचा प्रयत्न करू नका.

८ स्वयंपाकघरात तेल, तूपासारख्या निसरड्या वस्तू सांडल्यास त्वरित फरशी पुसून घ्या. अन्यथा घसरून पडाल.

९) वातीचा स्टोव्ह तोंडाने फुंकू नका. भडका उडण्याचा संभव असतो.

१०) हीटर वा इतर विद्युत साहित्य वापरताना पायात प्लॅस्टिकच्या चपला घाला. ओल्या हाताने फ्रीज उघडू नका. फ्रीज उघडा ठेवू नका.

११) गॅस सिलेंडर बदलत असताना किंवा नवा गॅस पेटवत असताना जळणाऱ्या इतर साधनांना बंद करावे. (लाईट, दिवा, उदबत्ती वगैरे)

१२) दर चार दिवसांनी स्वयंपाक घराची स्वच्छता करा म्हणजे जंतुप्रसार होणार नाही. तसेच कीटक, झुरळ व पाली होणार नाहीत. खरकटे ताबडतोब टाकून नष्ट करावे. अन्यथा घरात चिलटं होतात.

## आशावादी राहूनच आपण सर्व अडचणींना तोंड देवू शकतो



एका संशोधनानुसार, महिलांना नेहमी पती, मुलं, मित्र–मैत्रिणी, शेजारी आणि त्यांचं खासगी जीवन महत्त्वाचं वाटतं; पण स्वतःला मात्र त्या जमेत धरत नाहीत. कदाचित हा त्यांच्या उपजतच गुण असावा. दुसऱ्यांना सतत प्रसन्न ठेवणे.

एवढेच त्यांना ठाऊक असते.स्त्रिया आपल्या आवडीच्या माणसांना खूष ठेवण्याचा जास्त प्रयत्न करतात. एक पत्नी आणि आईची भूमिका निभावताना आपल्याही काही प्राथमिक गरजा आहेत, हे त्या विसरूनच जातात. त्याचाच परिणाम म्हणून बऱ्याचशा स्त्रियांना आपल्याला जीवनातून काय मिळवायचंय हेच समजत नाह. स्वतःला महत्त्व देणे हे आरोग्य आणि मानसिक संतुलनासाठी आवश्यक आहे. आपल्या गरजा काय आहेत, हे समजून घेऊन आनंदी राहण्यासाठी त्या पूर्ण केल्या पाहिजेत. आपल्या गरजांना कुणीतरी दुसरे समजून घेतील या भरवशावर राहिल्यास पदरी केवळ निराशाच पडेल.

नकारात्मक विचारांची साथ सोडा

आशावादी राहूनच आपण सर्व अडचणींना तोंड देऊ शकतो. त्यांवर विजय मिळवू शकतो. पॉझिटिव्ह विचारांमुळे आपली इम्यून सिस्टिम चांगली राहाते. या पॉझिटिव्ह विचारांचे महत्त्व पाहाता आज कित्येक लहान–मोठ्या शहरांमध्ये लाफटर क्लब उघडण्यात आले आहेत.

माइंड सेट बदला : दुसऱ्यांच्या भरवशावर जगणं सोडून द्या. स्वतःवर विश्वास ठेवा. सर्वांत चांगले बनण्याच्या नादात स्वतःलाच संपवू नका. आपल्या उणिवांसह स्वतःला स्वीकार करायला शिका. कधी–कधी तडजोड करायला काहीच हरकत नाही आणि हे तेव्हाच घडू शकते जेव्हा आपण स्वतःला त्या योग्यतेचे बनवू शकू. जीवनात व्यवस्थित राहून आपल्या प्राथमिकता ठरवा. आपल्या गरजा ओळखा : तुम्ही जर तुमच्या गरजा ओळखू शकत नसाल, तर हीच गोष्ट तुम्हाला आतल्या आत सतावत राहील. याने, राग निर्माण होऊन तो तुमच्या व्यक्तिमत्त्व विकासास बाधक ठरू शकतो. विवेक आणि कर्तव्याचा जोरावरच आपल्याला आपला आनंद मिळवायचाय.

जे मिळालंय, त्याचा आदर राखा आपल्याजवळ बरंच काही असतं; पण आपलं त्याकडे कधी लक्षच जात नाही. आपण जे काही मिळवलंय किंवा जे काही मिळालंय त्याचा आदर करायला शिका. इतरांवर एकसारखा आरोप करणे, ईर्ष्या करणे या गोष्टी सोडून द्या.

पुढे चालता राहा : कुणी जर आपल्याशी वाईट वागले असेल किंवा कुणी आपले वाईट केले असेल, तर एकसारखा तोच विषय डोक्यात घेऊन कुढत बसण्यापेक्षा त्यातून बाहेर पडावे. अन्यथा, त्यातून होणारे नुकसान आपल्यालाच भोगावे लागेल. हे जीवन एकसारखं मिळत नसतं; ते एकदाच मिळतं.

त्यामुळे त्याला अशाप्रकारे वाया घालवू नका. ‘क्षमा करा आणि विसरू जा’ या नीतीचा अवलंब करून पुढे पुढे चालत राहा. असे केल्यास, जीवन तुमचे स्वागत करायला तुम्हाला आनंद द्यायला सदैव तयार असल्याचे दिसून येईल. वर्तमानात जगा आणि भरपूर एन्जॉय करा. अशा रीतीने जगा की, तुमच्या जीवनाकडे आणि जगण्याच्या ढंगाकडे पाहन लोकांनीच म्हणावे, ‘‘व्वा ! लाइफ हो तो ऐसी.’’

## देवपूजेतही पानाला अनन्यसाधारण महत्व आहे

’पान खायो सैया हमार’ पासून ते ’खैके पान बनारसवाला’ पर्यंत आपल्याकडे पानाचा महिमा वर्णन केलेला आहे. काही जण कधी तरी पान खातात, तर काहींची ती सवय आहे. पान खाणे आरोग्यासाठी चांगले असल्याचे आयुर्वेदात नमुद आहे. पण त्याचे सेवन प्रमाणात हवे. अतिशयोक्ती, मग ती कशाचीही असो. ती वाईटच.

पान फक्त मुखशुद्धसाठीच खातात, असे नाही, देवपूजेतही पानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंदू धर्मात प्रत्येक पुजेत पानाचा उपयोग होतोच. आकार, स्वाद, आणि उंची प्रमाणे याचे प्रकार पडतात. पान हा प्रचलित शब्द असला तरी, याला मराठीत विडा या नावाने



ओळखले जाते. राज्यांच्या खासीयतीप्रमाणे पानांची चव बदलते. यात बनारसी, त्यातही मीठा, तीखा, बगैर सुपारी, साधा मसला, गुलकंद, आणि तंबाखू टाकूनही त्याचे अनेक प्रकार पडतात. लिहायला गेलं तर जागा कमी पडेल एवढे पानांचे प्रकार आहेत.

पानाचे फायदे व औषधी उपयोग

पानाने पाचनशक्ती वाढते आणि मंदाग्नी, बद्धकोष्ट दूर होतो.

गळ्यासंबंधी विकारांवर पान फायदेशीर आहे. त्याने आवाजसुद्धा साफ होते

तोंडाची चव, मळमळ अशावेळी पान जरूर खावे.

हृदयगतीला नियंत्रित ठेवतो.

पानामुळे पोटातले कृमी मरतात.

सर्दी–खोकल्यात पानाचा रस मधासोबत घेतल्याने फायदा होतो.

हिरड्यांना पायरिया नावाच्या रोगाने वाचवून मजबूत बनवतो.

पानाचे होणारे नुकसान

विड्याच्या पानाला जर्दाबरोबर (तंबाखू) खाल्लयास पानातील गुण नष्ट होतात.

विडा नेहमी जेवण झाल्यानंतरच खायला पाहिजे. रिकाम्या पोटी पान खाणे चांगले नसते.

जास्त पान खाल्लयास वा त्याची सवय असल्यास त्रास होतो. तोंड किंवा डोळ्यांसंबंधी रोग होण्याची शक्यता असते.

पानासोबत जास्त कात टाकल्यास श्वसनाचा विकार होण्याची शक्यता असते.

ज्यांना ताप, दातांचे विकार असतील त्यांनी पान खाणे शक्यतो टाळावे.

हे उष्ण व पित्तकारक आहे. मुलांना, गर्भवती महिलांना, गरम प्रवृती असणाऱ्या लोकांना हे हितकारक नसते.

## क्षुल्लक बारीक सारीक गोष्टींबाबत संशय घेणे वाईट असते



बऱ्याच जणांना उठसूट इतरांवर संशय घेण्याची सवय असते. त्यामुळे त्यांचे कोणाशी पटतही नाही आणि ते नेहमी तणावग्रस्तही राहतात. आपणही नाही ना या सवयीच्या शिकार.

क्षुल्लक बारीक सारीक गोष्टींबाबत संशय घेणे अत्यंत वाईट असते. त्यामुळे विश्वास उडून संबंधात कटूता व दरी निर्माण होते. विनाकारण संशय घेतल्याने उत्तम संबंधही बिघडतात.

वास्तविक एखाद्यावर संशय घेण्यापूर्वी आपण काही गोष्टींवर विचार करायला हवा.

✻ आपल्या संशयाचा एखादा भक्कम पाया आहे की आपण विनाकारणच एखाद्यावर संशय घेत आहोत.

✻ ती व्यक्ती खरोखरच असे काही करू शकते का ?

✻ पती वा पत्नीने एकमेकांवर संशय घेण्यापूर्वी आपल्या मनाशी शांतपणे विचार करावा व प्रकरणाच्या मुळाशी जावे. एकमेकांशी बोलावे.

✻ एखादी गोष्ट स्पष्ट झाल्यानंतर वारंवार त्या विषयी चर्चा करू नये.

✻ एकमेकांना समजावण्याचा प्रयत्न करीत आदर करावा. एखाद्याचा अवमान करण्याचा प्रयत्न करू नये.

✻ एकमेकांच्या सांगण्यावर विश्वास ठेवावा. क्षुल्लक गोष्टी जादा वाढवू नयेत.

✻ प्रत्येक नात्याची मर्यादा समजून त्यानुसार वागावे.

✻ आपल्या वस्तू सुरक्षित सांभाळून ठेवाव्यात. विनाकारण घरातील नोकर–गड्यांवर संशय घ्यावा लागणार नाही.

✻ एखाद्याच्या खासगी जीवनात गरजेपेक्षा जास्त रस घेऊ नये व आपल्या खासगी जीवनातही कोणाला डोकावू देऊ नये.

✻ जर आपण आपला संशयी स्वभाव झटकला तर विनाकारण वाढणारा ताण व त्रास टाळू शकतो.

## ड्रेस वा साडीनुसार चपला किंवा सँडल वापरा

पार्टी, लग्न समारंभात जाण्यासाठी तयारी करताना बहुतेक महिला फक्त मेकअप, कपडे, ज्वेलरी इकडेच लक्ष देतात व बूट, चपला, सॅण्डल्सचा विचारच करीत नाहीत, त्यामुळे आपल्या सौंदर्याचा पायाच खराब दिसतो.

**योग्य मापाचे –** बूट, चपला, सॅण्डल्स याही फॅशनचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे त्याकडेही लक्ष द्यायला हवे. हल्ली बाजारात फूटवेयरमध्ये खूपच विविधता उपलब्ध आहे. परंतु आपल्याला ज्या आरामदायक वाटतील तीच पादत्राणे खरेदी करायला हवीत. ती जास्त टाइट व जास्त सैल नसावीत. अशा दोन्ही प्रकारच्या पादत्राणांमुळे चालताना खूप त्रास होतो.

**हाय हील्स –** हल्ली बाजारात हील्समध्येही बऱ्याच व्हरायटी पाहायला मिळतात. उदा. स्पाइक हील वुइथ प्लेटफॉर्म, स्पाइक ओन्ली, हाय किंवा लो हील; परंत आरोग्याच्या दृष्टीने हील्सचे सॅण्डल्स व्यवस्थित नसतात.



यामुळे पाठीच्या कण्यावर दुष्परिणाम होतात. आपण व्यवस्थित चालूही शकत नाही. प्रत्येक पाऊल सांभाळून टाकावे लागते.

**ड्रेस आणि फूटवेयर –** ड्रेसनुसारच फूटवेयर घाला. जर लहंगा–चुन्नी घालत असाल तर कोण पाहते वा काय फरक पडतो म्हणून पायात काहीही घातले नाही तरी लोक आपल्याला नावे ठेवतील.

लांब पायांसाठी पम शू स्टाइलचे स्पॅमिश घातल्यास आपल्या पायांचे सौंदर्य खुलून दिसेल.

जीन्सवर ‘थ्रिल’ घाला. ती आपण कॉलेज, कॅम्पस, रेस्टॉरंटसारख्या जागी घालू शकता. विविध रंगी व डिझाइन्सचे थ्रिल सलवार सूटसारख्या पारंपारिक पोषाखासोबतही घालू शकता.

जर आपण साडी नेसू इच्छित असाल तर मखमली, मोती वा जरीकाम असलेल्या चपला घालाव्यात. त्यामुळे चालण्यातही सहजता राहील; परंतु त्याही फ्लॅटच असाव्यात कारण आपल्या आरोग्याचा विशेषत: पाठीचाही विचार करायला हवा ना.

# ऑफिस अफेअरमुळे संकटात सापडाल; कामाच्या ठिकाणी काळजी घ्या

ऑफिसमध्ये बसून तासनतास एकत्र काम करत असल्याने काही कलिग्जमध्ये आपापसात भावनिक जवळीक निर्माण होऊ शकते. नंतर हळूहळू हे भावनिक मैत्रीचं नातं पुढे जाऊन प्रेमात परिवर्तित होतं. हा ऑफिस रोमान्सचा ट्रेंड आजकाल नॉर्मल झाला आहे. या नात्यात जेवढी उत्सुकता आणि मजा आहे असं वाटत असलं तरीही त्याच बरोबरीने अशी नाती खूप गुंतागुंतीची आणि कटकटीची असतात. एक चुकीचं पाऊल तुमच्या करिअर, मानसिक आरोग्य आणि प्रोफेशनल इमेज या तिन्हींवर एकाच वेळी परिणाम करू शकतं. अमेरिकन टेक कंपनी ॲस्ट्रोनॉमरचे सीईओ अँडी बायर्न आणि एचआर प्रमुख क्रिस्टिन कॅबोट यांचा एक व्हिडिओ काही काळापूर्वीच व्हायरल झाला होता, ज्यामध्ये ते कोल्डप्ले शो दरम्यान रोमँटिक होताना दिसत होते. व्हिडिओ व्हायरल होताच सीईओने नोकरी सोडली आणि आता एचआर प्रमुखांनीही कंपनीला राजीनामा दिला आहे. एका सर्वेक्षणातून समोर आलेल्या आकड्यांनुसार एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की जवळपास ३६ % लोक कधी ना कधी ऑफिसमध्ये कलिगसोबत रोमँटिक



रिलेशनशिपमध्ये होते. मात्र यापैकी बहुतांश प्रकरणात नातं संपुष्टात आल्यानंतरचं वातावरण फारच तणावपूर्ण होतं. यामुळे फक्त नात्यात असलेल्या त्या २ व्यक्तींखेरीज त्यांच्या आसपासच्या सहकाऱ्यांनाही त्या तणावाचा त्रास झाला. आज आपण पाहू या की अशा प्रकारच्या ऑफिस अफेअरचे नेमके धोके काय आहेत?

**गॉसिप आणि व्यावसायिक प्रतिमा**

कोणाला तुमच्या नात्याबद्दल कळले तर ऑफिसमध्ये गॉसिप होणारच, ज्यामुळे तुमची व्यावसायिक प्रतिमा खराब होऊ शकते.जर प्रकरण वरिष्ठ आणि कनिष्ठ यांच्यातील असेल तर सत्तेच्या गतिशीलतेमुळे ते ऑफिस धोरणाचे उल्लंघन मानले जाऊ शकते.

**ब्रेकअप नंतरचा ताण**

जर नातेसंबंध संपला तर दररोज त्याच व्यक्तीसोबत काम करणे मानसिकदृष्ट्या थकवणारा अनुभव बनू शकते.जर तुमच्या जोडीदाराला पदोन्नती किंवा विशेष जबाबदारी मिळाली तर इतर सहकारी त्याला पक्षपात मानू शकतात.

**काय खबरदारी घ्याल**

प्रत्येक कंपनीची स्वतःची आचारसंहिता असते. काही कंपन्या ऑफिस रोमान्सला परवानगी देतात, परंतु त्याबद्दल एचआरला माहिती देणे आवश्यक आहे. म्हणून प्रथम कंपनीचे धोरण समजून घ्या.

**व्यावसायिक दृष्टिकोन**

कामाच्या ठिकाणी एकमेकांबद्दल व्यावसायिक दृष्टिकोन ठेवा. जास्त वैयक्तिक बोलू नका किंवा प्रेमसंबंध व्यक्त करू नका. ऑफिसबाहेर तुमच्या नात्याला वेळ द्या. कामाशी संबंधित संभाषणे ऑफिसपुरती मर्यादित ठेवा आणि वैयक्तिक बाबी कामाच्या ठिकाणापासून दूर ठेवा. हे तुम्हाला तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करेलच पण तुमच्या नात्यात परिपक्वता देखील आणेल.

**ब्रेकअपसाठी मानसिकदृष्ट्या तयार रहा**

नाते जरी तुटले तरी, भावनिकदृष्ट्या स्वतःला हाताळण्यासाठी आधीच तयार रहा. व्यावसायिकांसारखे वागा आणि त्याचा तुमच्या कामावर परिणाम होऊ देऊ नका. तुमच्या नात्याबद्दल गोंधळलेले असाल तर जवळच्या मित्राशी किंवा कुटुंबातील सदस्याशी बोला. बाहेरून पाहणारी व्यक्ती तुम्हाला अधिक संतुलित सल्ला देऊ शकते.ऑफिसमधील प्रकरण योग्यरित्या हाताळले गेले तर ते नातेसंबंध तसेच व्यावसायिक जीवनाला हानी पोहोचण्यापासून वाचवू शकते. परंतु जर ते हलके घेतले तर ते करिअरसाठी घातक ठरू शकते. म्हणून प्रेम करा, पण ते हुशारीने आणि नियमांच्या मर्यादेत करा.

# देवघरात पाळा हे नियम



★ देवघरात देवदेवतांच्या मूर्तीची तोंडे कधीही दक्षिणेकडे किंवा एकमेकांसमोर करू नये.

★ देवघरात लावलेल्या समईची ज्योत दक्षिणेकडे असू नये. समईत नेहमी विषम वाती असाव्यात. तसेच निरंजन जाळतना तूप व तेल एकत्र घालू नये.

★ एका घरात दोन शिवलिंगे, शाळिग्राम, सूर्यकांत, चक्रांक, गणपती व शंख पुजू नये. शाळिग्राम सम पुजावेत. मात्र दोन पुजू नयेत. विषमात एक पुजावयास हरकत नाही.

★ पूजन करताना देवाला नेहमी करंगळी जवळच्या बोटाने अर्थातच अनामिकेने गंध लावावे.

★ देवपूजा करताना आपणं वापरत असलेली आसन आणि जपमाळ कधीही दुसऱ्यांना वापरण्यासाठी देऊ नये.

★ श्रीफळ चढविताना शेंडीचा भाग देवाकडे असावा. डोक्यावर टोपी लावून देवांना वंदन करू नये.

★ पूजा झाल्यावर देवाला दोन्ही हात जोडून नमस्कार करावे. कधीही एका हाताने नमस्कार करू नये.

# तुम्ही पित असलेला चहा विष तर नाही ना? पोषणतज्ज्ञांनी दिला 'हा' इशारा

अनेकांना सकाळी उठल्याबरोबर एक कप चहा घेतल्याशिवाय तरतरी जाणवत नाही, त्यांची सकाळची सुरुवातच चहाने होते; त्यामुळे फार पूर्वीपासून चहा आणि भारतीयांचे एक अनोखे नाते निर्माण झाले आहे. काही जण तर सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत चहाचा आस्वाद घेण्यास मागेपुढे पाहात नाहीत. ऑफिसमध्ये तर किती वेळा चहा होत असेल याची काही गणती नसते. त्यामुळे आपल्याला गल्लीबोळात, कॉर्पोरेट ऑफिसबाहेर एकतरी चहाची टपरी दिसतेच. पण, तुम्हाला माहितीये का तुम्ही पित असलेल्या चहाने तुम्ही आजारी पडू शकता?



चहा बनवताना काही सवयींचा आरोग्यावर विषासारखा वाईट परिणाम होऊ शकतो. आहारतज्ज्ञ लिमा महाजन यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर करत याबाबत इशारा दिला आहे. त्यांनी यात योग्य पद्धतीने चहा बनवण्याची रेसिपीदेखील सांगितली आहे. त्या नेमकं काय म्हणाल्या जाणून घेऊ

१) 'या' चुकीमुळे चहा बनू शकतो विष?

आहारतज्ज्ञ लिमा महाजन म्हणाल्या की, बरेच लोक एकदा चहा बनवल्यानंतर तो पुन्हा पुन्हा उकळून गरम करतात आणि पितात. या चुकीमुळे चहाचे एकप्रकारे विषात रुपांतर होते. कारण जेव्हा चहा आपण पुन्हा पुन्हा उकळतो, तेव्हा त्यामधून भरपूर टॅनिन बाहेर पडते. जरी टॅनिनचे काही आरोग्यदायी फायदे असले तरी त्याचे प्रमाण वाढले की त्याचा आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

**२) जाणवू शकतात 'या' समस्या**

चहा पुन्हा पुन्हा उकळवून प्यायल्याने अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. याचा यकृत, मूत्रपिंड आणि हृदयावर वाईट परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही तर तुम्हाला पोटफुगी किंवा गॅसची समस्यादेखील जाणवू शकते.

आहारतज्ज्ञांनी सांगितली चहा बनवण्याची 'ही' योग्य पद्धत

पोषणतज्ज्ञांनी सांगितले की, जर तुम्हाला चहा पिण्याची खूप आवड असेल तर तो योग्य पद्धतीने बनवला पाहिजे. यासाठी प्रथम एका भांड्यात पाणी उकळवा. नंतर त्यात लवंग, दालचिनी, बडीशेप यांसारख्या आवडत्या औषधी वनस्पती टाका. यानंतर ते पाच मिनिटे उकळू द्या. आता एका कपामध्ये चहापत्ती टाका, त्यावर औषधी वनस्पतींचे उकळवलेले पाणी त्यात ओता.

यानंतर कपावर झाकण ठेवून तो बाजूला ठेवा. नंतर औषधी वनस्पती ज्या भांड्यात उकळवल्या त्या भांड्यात थोडे दूध उकळवा. नंतर तुमच्या आवडीनुसार उकळवून घेतलेले दूध कपामध्ये मिक्स करा आणि पुन्हा दुसऱ्या कपात तो चहा गाळून घ्या आणि प्या.

(वरील लेख प्राप्त माहितीवर आधारित आहे, कोणतेही उपचार किंवा उपाय करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्या)

# दुपारी झोप येते? कॉफीऐवजी श्वासोच्छ्वासाचे 'हे' व्यायाम करा

दुपारी झोप आणि थकवा जाणवू नये म्हणून अनेक जण कॉफी घेतात. पण, कॉफीच्या जागी काही सोपे श्वासोच्छवासाचे व्यायाम केल्यास नैसर्गिक ताजेतवाना मिळू शकतो.

हे व्यायाम श्वासावर लक्ष केंद्रित करून ऊर्जा वाढवण्याचा सोपा मार्ग आहे. त्यातून मन शांत होते आणि शरीर ताजेतवाने राहते.

बेलोज ब्रिदिंग जोरात आणि पटकन श्वास घेतल्याने आणि सोडल्याने शरीराला ताजेतवाना मिळतो, याला बेलोज ब्रिदिंग म्हणतात.

चतुर्भुज श्वासोच्छवास चार सेकंद श्वास घेणे, चार सेकंद थांबणे, चार सेकंद श्वास सोडणे आणि चार सेकंद थांबणे ह्या सोप्या पद्धतीने मन आणि शरीराला आराम मिळतो.

अल्टरनेट ब्रिदिंग म्हणजे आधी एका नाकातून श्वास घ्या, मग दुसऱ्या नाकातून श्वास सोडा, नंतर नाक बदलून तेच करा. यामुळे हे तंत्र मनाला स्थिर करते आणि



ताणतणाव कमी करते, यामुळे दुपारी काम करण्याची ऊर्जा वाढते.

४५८ यात तुम्ही ४ सेकंद श्वास घ्या, ५ सेकंद श्वास ठेवा आणि ८ सेकंद श्वास सोडा. या पद्धतीत श्वास घेण्याचा, थांबण्याचा आणि सोडण्याचा वेग वेगळा ठेवला जातो, त्यामुळे तणाव कमी होतो आणि मानसिक ताजेपणा मिळतो.

सिंह श्वास (लायन ब्रीद): सिंहासारखा आवाज काढून श्वास सोडल्याने मानसिक ताण कमी होतो आणि शरीराला ऊर्जा मिळते.

कपालभाती प्राचीन योगसाधनेतील हा श्वासोच्छवासाचा व्यायाम शरीरातील विषारी घटक बाहेर काढतो आणि मेंदू ताजेतवाना करतो. उभ्या स्थितीत श्वास घेऊन शरीर ताणणे दुपारी थोडा वेळ उभे राहून श्वास घेणे आणि शरीर ताणण्याने स्नायू तणावमुक्त होतात आणि मनाला ताजगी मिळते.

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई - निविदा सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण, गणेशखिंड मंडल यांचेकडून मान्यताप्राप्त नोंदणीकृत ठेकेदारांकडुन M/s Garrisson Engineers, कोथरूड यांना वीज जोडणी देण्याकरिता ई - निविदा मागविण्यात येते आहे. **निविदा क्र. 09 / 2025 - 2026** असून **निविदा मुल्य रु. 84.51 लाख** इतके आहे. सदर निवेदेची संकेतस्थळावर उपलब्धतेची तारीख वाढविण्यात आलेली आहे. **निविदा दि. 18.8.2025, 16:00 वाजेपर्यंत** उपलब्ध आहे. **निविदा भरण्याची अंतिम तारीख 18.8.2025 17:00 वाजेपर्यंत आहे.** या निविदांबाबत संपूर्ण माहितीकरीता **https://etender.mahadiscom.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी.

RO/PZ / 114 / 2025-26 — अधीक्षक अभियंता गणेशखिंड शहर मंडल, पुणे

# पालकांनी मुलांसमोर रडणं ठीक आहे की नाही?

प्रत्येक घरांची आपली अशी एक कहाणी असतेच. जगण्याच्या रेट्यात असे काही क्षण येतात जेव्हा प्रगल्भ पालकांनाही हळवं वाटून मुलांसमोर रडू येतं. मनातल्या भावनांचा कल्लोळ एवढा जबरदस्त असतो की त्या साचलेल्या भावना डोळ्यांतून वाहू लागतात. पालक असले म्हणून काय झालं, आईबाबा हाडामांसाची माणसंच असतात. त्यांच्या वेदना, दुःख आणि होणारा मानसिक त्रास त्यांच्या चेहऱ्यावर स्वच्छ दिसतो. मात्र मूल जेव्हा आईबाबांना रडताना बघतो तेव्हा त्याच्या बालमनात अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. हे प्रश्न किंवा मुलांना



आईबाबांची वाटणारी काळजी या गोष्टी मुलांच्या दृष्टीने धोकादायक आहेत की कसं? याविषयी पेरेंटिंग कोच वान्या त्यागी यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. पाहू या, त्या काय सल्ला देतात.

**मुलाला तुम्ही रडताना दिसलात तर काय**

पेरेंटिंग कोच वान्या त्यागी म्हणतात, तुमच्या मुलाला अचानक तुम्ही रडताना दिसलात तर तुम्ही शांत राहणे आणि त्याला प्रामाणिकपणे, पण सोप्या भाषेत समजावून सांगणे सर्वात महत्वाचे आहे. तुम्ही असे काहीतरी म्हणू शकता, हो, मला सध्या थोडं दुःख होत आहे. सर्वांनाच कधी ना कधी असं वाटतं, आई, बाबा, अगदी आजीही. जेव्हा आपण दुःखी असतो तेव्हा कधीकधी आपल्याला रडावेसे वाटते, पण मी ठीक आहे.

**मुलाची समज वाढते**

अशा गोष्टींद्वारे मुलाला समजते की भावना सामान्य आहेत आणि त्या लपवण्याची गरज नाही. तो हे देखील शिकतो की दुःखी असूनही, एखादी व्यक्ती आपले काम करू शकते आणि परिस्थितीवर मात करू शकते.

**यातून मूल काय शिकते**

जेव्हा तुम्ही तुमच्या भावना लपवण्याऐवजी उघडपणे तुमच्या मुलाला व्यक्त करता तेव्हा तुम्ही त्याला भावनिक समज शिकवत असता.

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई - निविदा सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण, गणेशखिंड मंडल यांचेकडून मान्यताप्राप्त नोंदणीकृत ठेकेदारांकडून गणेशखिंड शहर मंडळा अंतर्गत कार्यकारी अभियंता चाचणी विभाग (बॅच-2) करीता वाहन पुरविण्यासाठीची निविदा मागविण्यात येत आहे. सदर **निविदा क्र. 10 आहे. निविदा मुल्य रु. 14.76 लाख** इतके आहे. संकेतस्थळावरील मुदत आहे **दि. 20.8.2025 रात्री 23:00 वाजेपर्यंत** उपलब्ध आहेत व निविदा भरण्याची अंतिम **दि. 20.8.2025 रात्री 23:55 पर्यंत आहे.** संपूर्ण माहिती कंपनीच्या **https://etender.mahadiscom.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

RO/PZ / 115 / 2025-26 — अधीक्षक अभियंता गणेशखिंड शहर मंडल, पुणे

जाहिर निविदा सुचना बी.-१ निविदा सुचना क्र.०१ सन २०२५-२६
ग्रामपंचायत कार्यालय कान्हेवाडी बु.ता.खेड जि.पुणे

ग्रामपंचायत कार्यालय,कान्हेवाडी बु ता.खेड,जि.पुणे वतीने सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कान्हेवाडी बु ता.खेड यांचे तर्फे खालील कामाचे नावासमोर रकाना क्रं. ६ मध्ये नमुद केलेप्रमाणे ग्रामविकास विभाग/जिल्हा परिषद पुणे यांचेकडील पंजीकरण केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार, वर्ग १ ते ७ व पुणे जि.प.नोंदणीकृत सुशिक्षीतबेरोजगार अभियंता तसेच पुणे जि.प.नोंदणीकृत मजुर संस्था अ वर्ग यांजकडुन दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ क्रं | कामाचे नाव | निविदा रक्कम रु | निविदा फी रु. | बायाणा फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कान्हेवाडी बु.अंतर्गत सुतारवस्ती येथे मारुती मंदिराजवळ बंदिस्त गटर करणे ता.खेड | १,६०,९७५/- | २३६/- | १,६१०/- | ३ महिने |
| २ | मौजे कान्हेवाडी बु.अंतर्गत खालची ठाकरवाडी येथे संजय खांदे बोअरवेल ते गुलाब पारधी घरापर्यंत न.पा.पु वितरण व्यवस्था करणे ता.खेड | १,६५,१०५/- | २३६/- | १,६५१/- | ३ महिने |

सुचना १) कोणतेही कारण न देता निविदा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा किंवा रद्द करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला असुन निविदा भरणा-या ठेकेदाराला निविदा फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही. (२)को-या निविदा नमुन्याची रक्कम पुणे जि.म.स.बँक येथे १३ सा.बा.संकीर्ण या निविदा विक्री किंमत या सदरी भरुन चलन दाखविल्यास को-या निविदा देण्यात येतील (३)को-या निविदा नमुन्याची रक्कम पुणे जि.म.स.बँकेच्या वेळेत अनामत सदरी भरणा करावी. निविदा सोबत डिमांड ड्राफ्ट अथवा कॉल रिसिट स्विकारली जाणार नाही.(४)आपणास दिलेल्या कामाच्या संपुर्ण रकमेस पुर्ण कालावधीतील कंत्राट कामांचा विमा काम सुरु करणेपुर्वी उतरविणे बंधनकारक राहील.(५) उपरोक्त पध्दतीने विमापत्र न घेता परस्पर विमा कंपनीकडुन विमापत्र घेतल्यास विमा संचालयाने कळविलेली विमा रक्कम बिलाचे देय रकमेतुन वसुल करणेत येईल. (६)को-या निविदाचा नमुना मा.सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय कान्हेवाडी बु ता.खेड यांचेकडुन दि. १४/०८/२०२५ ते दि.२०/०८/२०२५ सकाळी १०.३० ते ५.०० वा.सुटटीचे दिवस सोडुन देण्यात येतील.सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी हे भरुन पाठविलेल्या निविदा दि. १४/०८/२०२५ ते दि.२०/०८/२०२५ सकाळी १०.३० ते ५.०० वा.पर्यत सुटटीचे दिवस सोडुन ०२ पाकीटे पध्दतीने स्विकारतील दि.२१/०८/२०२५ रोजी सकाळी ११.३० वा.निविदा उघडल्या जातील.

सही/-
ग्रा.पं.अधिकारी
ग्रामपंचायत कान्हेवाडी बु ता.खेड

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत कान्हेवाडी बु ता.खेड

**जाहीर नोटीस**
**दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी दौंड यांचे कोर्टात**
**पिठासन अधिकारी, श्री मिनाज मुल्ला सो**

फौज/कावि/१११९/२०२३
दिनांक ०६/१०/२०२३

श्री. बाळासो वाल्मिक दौंडकर — अर्जदार
रा.बोरीऐंदी ता.दौंड जि.पुणे
ग्रामसेवक सो . — जाबदेणार
ग्रामपंचायत बोरीऐंदी ता.दौंड जि.पुणे

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकाौंस कळविण्यात येते कि अर्जदार श्री.बाळासो वाल्मिक दौंडकर यांची आई यशोदा वाल्मिक दौंडकर यांचा मृत्यू दि.२८/०८/२०२० रोजी बोरीऐंदी ता.दौंड जि.पुणे येथे राहत्या घरी त्यांच्या मृत्यूची नोंद जन्म/ मृत्यू दप्तरी नसल्याने सदर मृत्यूची नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी तसा मृत्यूचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे.प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे तसेच अर्जदार यांच्या सदर दाखल मिळणे बाबतचा आदेश होणेबाबत मागणी केलेली आहे सदर अर्जाबाबत सुनावणी १९/०८/२०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता नेमण्यात आलेली आहे

तरी या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते कि ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील ३० दिवसात जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः आगर विकलामार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी दौंड यांच्याकडे वकिलामार्फत मा.मंडल अधिकारी दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी मुदतीत हरकत न आल्यास श्री.बाळासो वाल्मिक दौंडकर यांची आई यशोदा वाल्मिक दौंडकर यांचा मृत्यूचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हि जाहीर नोटीस असे .


उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभागीय कार्यालय दौंड

# गणपतीच्या स्वागताला यंदा बुंदीचा लाडू करा घरीच

बुंदीचा लाडू प्रसादासाठी तसेच एखाद्या खास क्षणी खाल्ला जातो. त्यातही अनेक प्रकार आहेत. त्यापैकीच एक म्हणजे मऊ रसरशीत असा जिभेवर विरघळणारा बुंदीचा केशरी लाडू. बाजारात हा लाडू आरामात उपलब्ध होतो. मात्र त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते. घरी छान असा बुंदीचा लाडू करायला एकदम सोपा आहे. एकदा ही पद्धत पाहा. अगदी मस्त होतो.

**साहित्य**

बेसन, पाणी, बेकींग सोडा, साखर, खायचा केशरी रंग, वेलची पूड, तूप, भोपळ्याच्या



बिया

**कृती**

१. एका बारीक चाळणीत बेसन घ्या आणि ते चाळून घ्या. दोन वाटी बेसन घेत असाल तर त्यात एक ते दिड वाटी पाणी घालायचे. म्हणजे प्रमाण संतुलित राहील. बुंदी पाडणे तसे सोपे आहे. फक्त पाणी आणि बेसन योग्य प्रमाणात एकजीव करता आले पाहिजे. बेसनात पाणी घालून त्याचे पातळ असे मिश्रण तयार करायचे. त्यात थोडा बेकींग सोडा घालायचा. अति पातळ करायचे नाही. बुंदी पडत नाही.

२. गॅसवर तेल गरम करत ठेवायचे. तेल मस्त तापल्यावर त्यात गोल आकाराचे छिद्र असलेल्या कोणत्याही पात्राने बुंदी सोडायची. जर बुंदी करायचे साहित्य नसेल तर झारा वापरु शकता. तसेच जाड गोलांची चाळणी घरी असेल तर तिचा वापर करा.

३. एका पातेल्यात साखर घ्यायची. एक ते दोन वाटी साखर घ्यायची. तुम्हाला जसे गोड आवडे त्यानुसार प्रमाण घ्यायचे. साखर आणि पाणी घ्यायचे. दोन वाटी साखर असेल तर एक ते दिड वाटी पाणी लागते. साखरेचा एकतारी पाक तयार करायचा. छान पाक तयार झाल्यावर त्यात थोडी वेलची पूड घालायची. तसेच केशरी रंग घालायचा. रंग नाही घातला तरी चालेल. तयार बुंदी पाकात घालायची.

**जाहीर नोटीस**
**दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी दौंड यांचे कोर्टात**
**पिठासन अधिकारी, श्री मिनाज मुल्ला सो**

फौज/जन्म/मृत्यू/एस.आर/९१/२०२५
दिनांक ०७/०७/२०२५

रविंद्र वसंत सुखटणकर
रा.श्रीराम दुत्त निवास पाटील चौक ता.दौंड,जि.पुणे
विरुध्द
मुख्याधिकारी
दौंड नगरपरिषद दौंड

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते कि कै.वसंत गणेश सुखटणकर यांचा मृत्यू दि.१३/०८/१९७३ मृत्यू दौंड येथे राहत्या घरी ता.दौंड जि.पुणे येथे झाला .त्यांच्या मृत्यूची नोंद जन्म/ मृत्यू दप्तरी नसल्याने सदर मृत्यूची नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी तसा मृत्यूचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे.प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांच्या सदर दाखल मिळणे बाबतचा आदेश होणेबाबत मागणी केलेली आहे सदर अर्जाबाबत सुनावणी ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता नेमण्यात आलेली आहे

तरी या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते कि ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील ३० दिवसात जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः आगर विकलामार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी दौंड यांच्याकडे वकिलामार्फत मा.मंडल अधिकारी यवत दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी मुदतीत हरकत न असल्यास कै.वसंत गणेश सुखटणकर यांच्या मृत्यूचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हि जाहीर नोटीस असे .

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभागीय कार्यालय दौंड

**जाहीर नोटीस**
**दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी दौंड यांचे कोर्टात**
**पिठासन अधिकारी, श्री मिनाज मुल्ला सो**

फौज/जन्म/मृत्यू/एस.आर/९१/२०२५
दिनांक ०७/०७/२०२५

आरती विनोद बागडे वय.३५
रा.दौंड,ता.दौंड,जि.पुणे
विरुध्द
मुख्याधिकारी
दौंड नगरपरिषद दौंड

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते कि माझे पती विनोद मोहन बागडे यांचा जन्म दि.१३/०३/१९९१ जन्म दौंड येथे राहत्या घरी ता.दौंड जि.पुणे येथे झाला .त्यांच्या जन्माची नोंद जन्म/ मृत्यू दप्तरी नसल्याने सदर जन्माची नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी तसा जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे.प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांच्या सदर दाखल मिळणे बाबतचा आदेश होणेबाबत मागणी केलेली आहे सदर अर्जाबाबत सुनावणी ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता नेमण्यात आलेली आहे

तरी या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते कि ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील ३० दिवसात जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः आगर विकलामार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी दौंड यांच्याकडे वकिलामार्फत मा.मंडल अधिकारी यवत दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी मुदतीत हरकत न असल्यास विनोद मोहन बागडे यांच्या जन्माचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हि जाहीर नोटीस असे .

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभागीय कार्यालय दौंड

# महिलांनो यापुढे आयब्रो करताना सावधान! लिव्हर होऊ शकतं निकामी?

सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या एका व्हिडीओमध्ये, एमबीबीएस डॉ. आदितीज धामिजा हे सांगत आहेत की, आयब्रोज करण्यासाठी पार्लरमध्ये नियमित गेल्याने हेपॅटायटिस होण्याच्या शक्यतेमुळे लिव्हर निकामी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, जसे एका २८ वर्षीय महिलेच्या बाबतीत घडले. ती नियमितपणे आयब्रोज करायला जात होती; पण पुढे तिचे यकृत निकामी होऊ लागले. २८ वर्षांची महिला थकवा, मळमळ आणि डोळे पिवळे पडू



लागल्यानं रुग्णालयात आली. यावेळी चाचण्यांमध्ये असे दिसून आले की, तिचे लिव्हर व्यवस्थित काम करत नाहीये. यामागचं कारण अल्कोहोल किंवा औषधे नव्हे, तर ब्युटी पार्लरमध्ये झालेला निष्काळजीपणा त्याला कारणीभूत आहे. आयब्रोज करताना पुन्हा पुन्हा तोच धागा वापरण्यात आला. त्यामुळे त्वचेवर सूक्ष्म जखमा झाल्या आणि त्याद्वारे हेपॅटायटिस बी किंवा सी विषाणूंनी तिच्या रक्तप्रवाहात प्रवेश केला, असे डॉ. धामिजा यांनी एका इन्स्टाग्राम पोस्टमध्ये नमूद केले आहे

आयब्रोज चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्यास मदत करतात, जी सामान्यतः भुवयांना आकार देण्यासाठी किंवा चेहऱ्यावरील केस काढण्यासाठी वापरली जाते. पण, यामुळे लिव्हर निकामी होऊ शकते का? ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटलचे अंतर्गत औषध संचालक डॉ. अमित सराफ यांनी या संदर्भात बोलताना सविस्तर माहिती दिली आहे. डॉक्टर म्हणतात की, थ्रेडिंगमुळे लिव्हर निकामी होत नाही.

**जाहीर नोटीस**
**दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी दौंड यांचे कोर्टात**
**पिठासन अधिकारी, श्री रेवणनाथ लबडे सो**

अर्जक्र./जन्म/मृत्यू/एस.आर/७०/२०२४
दिनांक २९/०७/२०२५

पोपट गणपत माने
रा.भांडगाव ता.दौंड,जि.पुणे
विरुध्द
मा.ग्रामसेवक
ग्रामपंचायत भांडगाव

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते कि गणपत कोंडिबा माने यांचा मृत्यू दि.२२/१२/१९७२ मृत्यू भांडगाव येथे राहत्या घरी ता.दौंड जि.पुणे येथे झाला .त्यांच्या मृत्यूची नोंद जन्म/ मृत्यू दप्तरी नसल्याने सदर मृत्यूची नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी तसा मृत्यूचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे.प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांच्या सदर दाखल मिळणे बाबतचा आदेश होणेबाबत मागणी केलेली आहे सदर अर्जाबाबत सुनावणी १४/०८/२०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता नेमण्यात आलेली आहे

तरी या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते कि ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील ३० दिवसात जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः आगर विकलामार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी दौंड यांच्याकडे वकिलामार्फत मा.मंडल अधिकारी यवत दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी मुदतीत हरकत न असल्यास गणपत कोंडिबा माने यांचा मृत्यूचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हि जाहीर नोटीस असे .

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभागीय कार्यालय दौंड

**जाहीर नोटीस**
**दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी दौंड यांचे कोर्टात**
**पिठासन अधिकारी, श्री मिनाज मुल्ला सो**

फौज/कावि/४७४/२०२४
दिनांक २९/०७/२०२५

श्रीमती.रंजना रोहिदास कांबळे,
रा.यवत ता.दौंड,जि.पुणे
विरुध्द
मा.ग्रामसेवक सो,
ग्रामसेवक पुणे

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते कि ऋतुराज रोहिदास कांबळे यांचा जन्म दि.२९/०३/२००७ यवत ता.दौंड जि.पुणे येथे राहत्या घरी झाला .त्यांच्या जन्माची नोंद जन्म/ मृत्यू दप्तरी नसल्याने सदर जन्माची नोंद होणेबाबत परवानगी मिळणेकामी तसा जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे.प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांच्या सदर दाखल मिळणे बाबतचा आदेश होणेबाबत मागणी केलेली आहे सदर अर्जाबाबत सुनावणी १४/०८/२०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता नेमण्यात आलेली आहे

तरी या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते कि ज्या कोणास सदर अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील ३० दिवसात जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून स्वतः आगर विकलामार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी दौंड यांच्याकडे वकिलामार्फत मा.मंडल अधिकारी यवत दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी मुदतीत हरकत न असल्यास श्री.बाळू ज्ञानदेव कड यांचा ऋतुराज रोहिदास कांबळे यांच्या जन्माचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हि जाहीर नोटीस असे .

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभागीय कार्यालय दौंड

# कला विश्व




## भूषण पाटील यांचा 'कढीपत्ता' चित्रपट ७ नोव्हेंबरला महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

आजवर बऱ्याच प्रेमकथांनी रसिकांच्या मनावर गारूड केले आहे. त्यामुळेच निर्माते-दिग्दर्शकही वेगवेगळ्या पार्श्वभूमीवरील प्रेमकथा रसिकांसमोर सादर करत असतात. 'कढीपत्ता' या आगामी मराठी चित्रपटातही प्रेक्षकांना एक अनोखी प्रेमकहाणी पाहायला मिळणार आहे. 'अ बिटरस्वीट लव्ह स्टोरी' अशी या चित्रपटाच्या शीर्षकाला देण्यात आलेली टॅगलाईन उत्सुकता वाढविणारी आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून नव्या दमाचे निर्माता आणि दिग्दर्शकाची जोडी प्रेक्षकांच्या भेटीला एक युथफुल लव्ह स्टोरी घेऊन आले आहेत. ७ नोव्हेंबर रोजी 'कढीपत्ता' हा मराठी चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. युवान प्रोडक्शनची प्रस्तुती असलेल्या 'कढीपत्ता' चित्रपटाची निर्मिती स्वप्नील युवराज मराठे यांनी केली आहे. कथा लेखन व दिग्दर्शन विश्वा यांनी केले आहे. निर्माते स्वप्नील युवराज मराठे आणि दिग्दर्शक विश्वा यांचा हा पहिलाच चित्रपट आहे. पहिल्याच प्रयत्नांत दोघांनीही एक संगीतप्रधान प्रेमकथा प्रेक्षकांच्या भेटीला आणली आहे. या चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. मोशन पोस्टरवर निसर्गरम्य वातावरणात बसलेली नायक-नायिकेची जोडी आहे. चित्रपटात भूषण पाटील मुख्य भूमिकेत आहे, पण नायिका पाठमोरी बसलेली आहे. पाठमोरी बसलेल्या नायिकेच्या मुखातील संवाद खूप मार्मिक आहेत. ती म्हणते की, ए तुला आठवतं बाबांनी आपल्याला कढीपत्त्याचं महत्त्व सांगितलं होतं. आपण त्याचे गुणधर्म विसरतो आणि फक्त त्याचा उपयोग लक्षात ठेवतो. उपयोग हा क्षणभरासाठी असतो, पण मी तुला एक सांगू का, त्याचा गुणधर्म हा कायमचा राहतो. हाच उपयोग आणि गुणधर्म यातील फरक नक्की काय असतो तेच आपल्याला कळत नाही. या चित्रपटात भूषणची नायिका कोण, हे रहस्य सध्या तरी गुलदस्त्यात आहे. त्यामुळे चित्रपटाबाबतची उत्सुकता वाढते. लवकरच 'कढीपत्ता'मधील नायिकेचा चेहरा रिव्हील केला जाणार आहे. या चित्रपटात अक्षय टांकसाळे, संजय मोने, शुभांगी गोखले, गार्गी फुले, आनंदा कारेकर, गौरी सुखटणकर आदी कलाकारांच्याही भूमिका आहेत. याखेरीज आनंद इंगळे आणि चेतना भट पाहुण्या कलाकाराच्या रूपात दिसतील. छायांकन अनिकेत खंडागळे यांनी केले असून वितरणाची जबाबदारी सिनेपोलीस सांभाळणार आहे. संयुक्ता सुभाष या चित्रपटाच्या प्रोजेक्ट हेड, तर विशाल चव्हाण कार्यकारी निर्माते आहेत.




## 'अभंग तुकाराम'! दिग्पाल लांजेकरचा नवीन सिनेमा, अजिंक्य राऊत मुख्य भूमिकेत

दिग्पाल लांजेकर मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय दिग्दर्शकांपैकी एक आहे. आजवर दिग्पालने अनेक वैविध्यपूर्ण चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. अशातच आता तो लवकरच एक नवीन सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार आहे. दिग्पाल लांजेकर 'अभंग तुकाराम' हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार आहेत. हा सिनेमा जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या जीवनावर आधारित असल्याचं त्याने शेअर केलेल्या पोस्टमधून पाहायला मिळतं. यासह या चित्रपटात छोट्या पडद्यावरील लोकप्रिय कलाकार झळकणार असल्याचं दिसतं. 'अभंग तुकाराम' या चित्रपटात अभिनेता अजिंक्य राऊत, विराजस कुलकर्णी, अभिजीत श्वेतचंद्र, अजय पुरकर, समीर धर्माधिकारी, निखील राऊत, तेजस बर्वे आणि अभिनेत्री मृणाल कुलकर्णीसुद्धा झळकणार आहेत. यासह या चित्रपटात इतरही काही कलाकार पाहायला मिळणार आहेत. सोशल मीडियावर चित्रपटाचे मोशन पोस्टर शेअर करण्यात आले असून याला भक्ती, प्रेरणा आणि चैतन्याचा सोहळा! जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या गाथेची कथा.. असं कॅप्शन देण्यात आलं आहे. 'अभंग तुकाराम' ७ नोव्हेंबरपासून सर्वत्र चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित या चित्रपटाची कथा योगेश सोमण यांनी लिहिली आहे, तर पटकथा स्वत: दिग्पाल लांजेकरने लिहिली आहे. अभिनेता अजिंक्य राऊतनेही या चित्रपटासंदर्भात पोस्ट शेअर केली असून यामुळे 'अभंग तुकाराम' चित्रपटात अजिंक्य राऊत मुख्य भूमिकेतून झळकणार का याची उत्सुकता त्याच्या चाहत्यांमध्ये असल्याची त्याच्या पोस्टखालील कमेंट्समधून पाहायला मिळत आहे. 'अभंग तुकाराम'मध्ये अजिंक्यसह विराजस कुलकर्णी व तेजस बर्वेही पाहायल मिळणार आहेत. पोस्टखाली त्यांनाही टॅग करण्यात आलं आहे. दरम्यान, दिग्पाल लांजेकरच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर त्याने आजवर अनेक चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटापूर्वीच नुकताच त्याचा 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट प्रदर्शित झालेला. यापूर्वी त्याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. अशातच आता त्याने नुकताच त्याच्या 'अभंग तुकाराम' या चित्रपटाचा व्हिडीओ शेअर करत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी 'ऑपरेशन सिंदूर' आणि 'स्वदेशी' विषयी जनजागृती करावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात गणेशोत्सव साजरा करावा

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी यावर्षीच्या गणेशोत्सवामध्ये भारताने जगाला ऑपरेशन सिंदूरद्वारे दाखविलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनासोबत समन्वय ठेवून हा गणेशोत्सव शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करीत ' ऑपरेशन सिंदूर' वर आधारित देखावे हे जवानांसाठी समर्पित असण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सवा दरम्यान गणेश भक्तांना कुठल्याही प्रकारे अडचणी येणार नाहीत, त्यापद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या. सार्वजनिक गणेशोत्सव निमित्त कायदा व सुव्यवस्था बैठकीचे आयोजन सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस आढावा घेताना बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.



सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाप्रमाणे मूर्तीकारांनाही सलग पाच वर्ष परवानगी देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मूर्तीकारांनी या परवान्यांचे दरवर्षी नूतनीकरण करावे. परवानगीसाठी महापालिके मार्फत सुरू करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीवर आधारित एक खिडकी योजनेचा लाभ घेण्यात यावा. गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावांची संख्या आणि उंच मूर्तींचे खोल समुद्रात विसर्जनासाठी बोटींची संख्याही समुद्रकिनारी वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गणेशोत्सवाला राज्य शासनाने राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे राज्य शासनातर्फे हा महोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विस्तृत नियोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सव मंडळांना मागील वर्षी दिलेल्या सर्व सवलती याही वर्षी कायम ठेवण्यात येतील. हा उत्सव साजरा करताना कायद्याचे योग्य पालन करावे. ईद ए मिलाद सणही गणेशोत्सवा दरम्यान येत असल्याने समन्वयाने धार्मिक सौहार्दता ठेवत कुठेही कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. गणेशोत्सवादरम्यान ध्वनिक्षेपकांना दिलेल्या परवानगीचे दिवस वाढविण्यासाठी न्यायालयाच्या अधीन राहून सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यालयांसाठी मालमत्ता कराची आकारणी करताना या कार्यालयांचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग होत नसल्याबाबत मंडळांनी प्रशासनाला लेखी दिल्यास, अशा मंडळांच्या कार्यालयांवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येणार नाही, असा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

बैठकीस गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव (विशेष) अनुपकुमार सिंग, बृहन्मुंबई मनपा आयुक्त भूषण गगराणी, सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष गणेश दहिबावकर आदींसह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, गणेशोत्सव समित्या आणि मूर्तिकार संघटनांचे अध्यक्ष उपस्थित होते, तर दूरदृश्य प्रणालीद्वारे मनपा आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी सहभाग घेतला. बैठकीत महापालिका अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांनी सादरीकरण केले.

## अनुकंपा तत्त्वावरील नोकरी बाबत अधिकाऱ्यांनी संवेदनशील रहावे : मंत्री प्रताप सरनाईक

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई: आपल्या परिवारातील कर्ता पुरुष गेल्यानंतर आर्थिक आणि मानसिक दृष्ट्या खचलेल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी अनुकंपा तत्त्वाच्या नोकरीची अत्यंत गरज असते. अशावेळी अधिकाऱ्यांनी संवेदनशील राहून संबंधित पात्र उमेदवाराला लवकरात लवकर नोकरी देऊन त्याला आर्थिक स्थैर्य कसे मिळेल हे पाहिले पाहिजे ! असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. ते एसटी महामंडळाच्या मुख्यालयात ७० उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नोकरीचे नियुक्तीपत्र देण्याच्या समारंभात बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख यांच्यासह उमेदवारांचे कुटुंबीय व एस टी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात म्हणजे एसटी महामंडळात शासनाच्या धर्तीवर रा.प. सेवेत असताना अधिकारी/ कर्मचारी मृत झाल्यास त्यांच्या अवलंबितांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याची तरतूद आहे.

त्यानुसार सन २०१६ पासून प्रलंबित असलेले अनेक अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीचे प्रस्ताव मार्गी लावण्यात आले आहेत. या बरोबरच विभागीय स्तरावर आणखी ६६ उमेदवारांना ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत अनुकंपा तत्त्वावर नोकरीचे नियुक्तीपत्र दिले जाणार आहे.

## ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्यासाठी शासन सकारात्मक : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : आजच्या डिजिटल युगात ग्रंथालय चळवळ टिकेल का असा प्रश्न पडतो पण आजची तरुण मंडळी अधिक ग्रंथालयाकडे वळली आहे. विविध वाचन उपक्रमात सक्रिय सहभाग घेत आहेत, त्यासाठी ग्रंथालयांना पुस्तकांनी समृद्ध करावं, असे आवाहन करून ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्यासाठी शासन सकारात्मक आहे, असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.



एसएनडीटी महिला विद्यापीठ, पाटकर सभागृह येथे सन २०२३-२४ चे उत्कृष्ट ग्रंथालय आणि उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी अपर मुख्य सचिव बी वेणूगोपाल रेड्डी, राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, उपसचिव अमोल मुत्याल, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार आदी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील पुढे म्हणाले, यंदा ग्रंथ प्रदर्शन माध्यमातून जवळपास ४० कोटी पुस्तकांची विक्री झाली. १० लाख वाचकांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली. यामध्ये ४ लाख शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. ग्रंथालय चळवळ टिकावी आणि पुढे वाढत जावी यासाठी ' एक तास शांतता... पुणे वाचत आहे, १५ दिवसात पुस्तक वाचून परीक्षण लिहिणे यासारखे अनेक उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये ३ लाख ७५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण सुद्धा लिहिले.

वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी प्रदर्शने, पुस्तक परीक्षण, कविता वाचन यासारखे कार्यक्रम राबविण्यात यावीत. ग्रंथालय चळवळीच्या विकासासाठी मान्यता रद्द झालेल्या २ हजार नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात येणार आहे. तसेच ज्या सार्वजनिक वाचनालयाला ५०, ७५ व १०० वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांना विशेष अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केली.

## समाजातील भेदाभेद दूर करून एकात्मतेचा संदेश देणे हा संतांचा धर्म : मंत्री छगन भुजबळ

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र ही संतभूमी आहे. संत चोखामेळा, संत जनाबाई, संत नामदेव यांसह अनेक संतांनी जात-पात व उच्च-नीच भेद नष्ट करून समतेचा संदेश दिला. संत साहित्याच्या माध्यमातून दया, क्षमा, करुणा आणि प्रेम यांचा प्रसार झाला. समाजातील भेदाभेद दूर करून एकात्मतेचा संदेश देणे हा संतांचा धर्म असल्याचे प्रतिपादन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

वारकरी साहित्य परिषदेच्यावतीने आयोजित कार्यक्रमात मंत्री श्री.भुजबळ बोलत होते. या कार्यक्रमाला मराठी भाषा, उद्योग मंत्री उदय सामंत, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, आमदार संतोष बांगर, माजी आमदार शहाजी पाटील, वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष ह.भ.प. विठ्ठल महाराज पाटील, ह.भ.प. निवृत्ती महाराज रामदास, ह.भ.प. नरहरी महाराज चौधरी, ह.भ.प.रामदास महाराज तसेच राज्यभरातील वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




मंत्री सामंत यांनी सांगितले की, वारी ही जगातील सर्वात मोठी आध्यात्मिक परंपरा आहे. वारकरी साहित्य संमेलनासाठी संपूर्ण मदत दिली आहे.

## जास्तीत जास्त शाळांमध्ये स्काऊट गाईडची अंमलबजावणी करावी : मंत्री दादाजी भुसे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : विद्यार्थ्यांना बालवयापासूनच मूल्य शिक्षण, स्वावलंबन, शिस्त, संस्कारांच्या माध्यमातून उत्तम भावी नागरिक घडविण्यात स्काऊट, गाईडची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. इच्छुक शालेय विद्यार्थ्यांना यात सहभागी होता यावे यासाठी जास्तीत जास्त शाळांमध्ये स्काऊट गाईडची अंमलबजावणी करावी, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.

राज्यातील जास्तीत जास्त शाळांमध्ये स्काऊट गाईडची अंमलबजावणी करण्याबाबत आज मंत्रालयात बैठक पार पडली. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, प्रधान सचिव रणजित सिंह देओल, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, उपसचिव तुषार महाजन, क्रीडा विभागाचे सहायक संचालक तथा महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस्चे राज्य चिटणीस मिलिंद दिक्षित उपस्थित होते. तर शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.



मंत्री भुसे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या माता पित्यांचा, वडीलधाऱ्यांचा, गुरुजनांचा आदर करणे, शिस्त अंगिकारणे आदी बाबी शिकणे आवश्यक आहे.

## स्वातंत्र्यदिनी कोणी काय खावे हे सरकार ठरवणार का? : हर्षवर्धन सपकाळ

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : स्वातंत्र्य दिन हा राष्ट्रीय सण आहे, अख्खा देश स्वातंत्र्यासाठी लढत होता तेव्हा भाजपाचे पूर्वज ब्रिटिशांसोबत होते, काहीजण ब्रिटिशांची पेन्शन खात होते, इंग्रजांना मदत करत होते. भाजपाच्या पूर्वजांवरचे हे काळे डाग लपवण्यासाठीच स्वातंत्र्यदिनी कोणी काय खायचे याचे फतवे काढले जात आहेत, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपा सरकारवर सडकून टीका केली. ते पुढे म्हणाले की, वन नेशन वन लिडर संकल्पना आणून एकच नेता, एकच पेहराव, एकच भाषा आणि एकच खानपान करून देशातील विविधतेतील एकता संपवायची आणि हुकूमशाही आणायची हा भाजपाचा डाव आहे. हिंदू-मुस्लीम वाद तर दररोजच सुरु आहे. आधी मराठा ओबीसी वाद घातला त्यानंतर मराठी हिंदी वाद व आता १५ ऑगस्टला मासांहार करु नये यासाठी फतवा काढला आहे, जनतेवर सर्वप्रकारे सरकारी नियंत्रण आणण्याचा हा प्रकार आहे. कबुतरांना जगण्याचा अधिकार आहे तसाच माणसांनाही जगण्याचा अधिकार आहे. कबुतरांचे पंख व विष्टेपासून फुप्फुसाचे गंभीर आजार होतात यात काहीजणांना जीवही गमवावा लागतो त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही तेवढाच महत्वाचा आहे, पण भाजपा सरकारने जाणीव पूर्वक कबुतर जिहाद सुरु केला आहे. सरकारने अदानीला अर्धी मुंबई देऊन टाकली आहे आणि मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडेही मुंबईत भरपूर जमीन आहे. या जमिनीवर लोढा व अदानी विशेष कबुतर प्लाझा उभा करावा असे सपकाळ म्हणाले.

भाजपा युती सरकारमध्ये टोळीयुद्ध सुरु आहे, प्रचंड भ्रष्टाचार बोकाळला आहे, राज्य दिवाळखोरीत काढले आहे तसेच मतचोरीच्या वास्तवापासून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी भाजपा सरकारनेच कबुतर खान्याच्या प्रश्नाला हवा दिली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी राज्यात दंगा नियंत्रण पथक स्थापन केले होते पण देवेंद्र फडणवीस यांनी दंगो करो पथक स्थापन केले आहे. हे पथक नागपूर, पुणे, नाशिक, मुंबईमध्ये पाठवून सामाजिक शांतता भंग करत आहे.




✲ संपादक – संजय प्रल्हाद भोकरे ✲ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com